12-08-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

MSS/ 11:00

08-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

MSS/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**<u>नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री. संजय दत्त : विषय अत्यंत महत्वाचा आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : राज्यात भयानक अशी दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सोयाबीन पिकविणारा शेतकरी, कापूस पिकविणारा शेतकरी, धान पिकविणारा शेतकरी यांना या सरकारने तातडीने आर्थिक पॅकेज देण्याची गरज असून त्यासंदर्भात आम्ही 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. ही सूचना मंजूर करुन सभागृहामध्ये चर्चा सुरु करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे कोणत्या नियमाखाली म्हणणे मांडत आहेत याचा कृपया खुलासा करावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना माझ्याकडे दिलेली आहे. सूचनेतील विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे आजचे दैनंदिन कामकाज तहकूब करुन प्रस्तावाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे. राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने हा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा दिलेला असून तो देखील त्याच विषयाशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दिलेला विषय हा नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा विषय कसा होतो हे त्यांनी 5 मिनिटांमध्ये सांगावे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली असून त्याबाबत ते आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांच्या सूचनेला पाठिंबा देतो. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेनुसार प्रथम सभागृहामध्ये मंत्र्यांचा परिचय करुन देणे आणि त्यानंतर शोक प्रस्ताव संमत होणे आवश्यक आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ.अब्दुल रहमान अंतुले व माजी केंद्रीय मंत्री व माजी वि.प.स. श्री.मुरली देवरा यांच्या दु:खद निधनाबद्दल आज शोक प्रस्ताव घेण्यात येणार आहे. या सभागृहाचे कामकाज करीत असताना चुकीची प्रथा पडू नये म्हणून मी हरकतीचा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कामकाज पत्रिकेवरील बाबी पूर्ण झाल्यानंतर नियम 289 अन्वयेच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्यांना म्हणणे मांडण्याची परवानगी देण्यात यावी एवढीच माझी विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, गेल्या आठवड्यात राज्यामध्ये जवळजवळ 52 शेतक-यांनी आत्महत्या केली आहे. असे असताना त्यांच्या मृत्यूबाबत शोक प्रस्ताव घेण्याची सरकारला गरज का वाटली नाही?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मी उपस्थित केलेल्या नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला पाठिंबा दिला आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आज राज्यामध्ये सरकार अस्तित्वात आहे, मंत्रिमंडळ अस्तित्वात आहे. त्यामुळे मंत्र्यांचा परिचय करुन देण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधीचा मुद्दा अधिक महत्वाचा आहे, असे माझे मत आहे. राज्यामध्ये सोयाबीन, कापूस, धान पिकविणारे, दूध उत्पादन करणारे लाखो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : प्रथम माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याबाबत माझा निर्णय देणे आवश्यक आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कृपया खाली बसावे.

श्री.माणिकराव ठाकरे : मंत्र्यांचा परिचय करुन देण्यापूर्वी मी नियम 289 अन्वयेच्या स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली आहे. राज्यामध्ये मंत्रिमंडळ अस्तित्वात आलेले आहे, त्यामुळे आम्ही सरकारला आवाहन करीत आहोत. राज्यामध्ये शेकडो शेतक-यांनी आत्महत्या केलेली असताना राज्य सरकारने कोणतेही पॅकेज जाहीर केलेले नाही. सरकार नाटक करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कृपया खाली बसावे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, मात्र त्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला पाठिंबा दिलेला आहे. त्यांचे एवढेच म्हणणे आहे की, सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर नमूद केलेल्या बाबी पूर्ण झाल्यानंतर माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना त्यांच्या सूचनेबाबत म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी.

आजच्या कामकाज पत्रिकेवरील शोक प्रस्ताव संमत झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित होणार आहे.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती**.......

सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे काय म्हणणे आहे ते देखील मी ऐकून घेतो, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे तसेच सत्तारुढ पक्षाच्या वतीने मा. मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे-पाटील यांनाही आपले म्हणणे मांडावयाचे असल्याने मी यासंबंधी थोडक्यात बोलण्याची संधी दिल्यानंतर याबाबतचा निर्णय देईन. सभागृहासमोर कॉंग्रेसचे नेते व माजी मुख्यमंत्री तसेच माजी केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा आणि श्री. भास्कर शिंदे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव असे कामकाज सभागृहासमोर आहे. तद्वत विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वये जी सूचना देण्यात आलेली आहे त्यातील विषय अत्यंत महत्वाचा असून राज्यातील दुष्काळी परिस्थीमध्ये जनता होरपळत आहेत, शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे,अशा परिस्थितीत विरोधी पक्षाच्या नेत्यांचेही म्हणणे मी ऐकून घेणार आहे. वास्तविक सभागृहाची प्रथा अशी आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर अपण नियम 289 अन्वये च्या सूचनेचा विचार करीत होतो पण आज पहिलाच दिवस असून कामकाज पत्रिकेमध्ये प्रश्नोत्तराचा तास नसल्यामुळे नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत विचार मांडण्यासाठी मी परवानगी देणार आहे. प्रथम मा. मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे-पाटील यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

श्री. एकनाथराव खडसे-पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमानुसारच चालले पाहजे, असा आपला नेहमीच प्रयत्न असतो. या निमित्ताने मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेत नियम 289 अन्वयेच्या सूचने संबंधीचा कोठेही उल्लेख दिसत नाही. कामकाज पत्रिकेत प्रथम वन्दे मातरम्, नवीन मंत्र्यांचा परिचय, त्यानंतर तालिका निर्देशित करणे आणि नंतर शोक प्रस्तव असा क्रम दाखविलेला आहे. सभागृहातील कामकाज घेण्यासंबंधी संपूर्ण अधिकार पीठासीन अधिकारी म्हणून आपलाच आहे. विरोधी पक्षाकडून राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असला तरी राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि सरकार झोपलेले आहे व ही बाब विरोधी पक्षाने शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, अशी परिस्थिती मात्र नक्कीच नाही. हे सरकार सत्तेवर येऊन केवळ एक महिना झालेला आहे तरी देखील या सरकारने दुष्काळासंबंधीच्या अनेक उपाययोजना केल्या व आवश्यक निर्णय देखील घेतले आहेत.......अडथळा......

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे-पाटील....

विरोधी पक्षाच्या वतीने हा विषय नियम 289 अन्वये चा कसा होतो हे सांगण्याचा प्रयत्न झाला पण हा विषय नियम 289 चा कसा होत नाही, हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. याचे करण असे की यासंदर्भात शासनाने अनेक उपाययोजना केल्या असून यापुढेही करणार आहोत. तसेच चर्चा करण्याची आणि त्याला उत्तर देण्याची शासनाची केव्हाही तयारी आहे पण हा विषय निदान आज तरी नियम 289 चा होत नसल्याने तो आपण फेटाळावा अशी माझी विनंती आहे.

सभागृहात काँग्रेस पक्षाचे नेते व माजी मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री बॅ. अंतुले, श्री.मुरली देवरा आणि श्री. भास्करराव शिंदे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्तावाचा विषय असून कामकाज पत्रिकेत नियम 289 अन्वये सूचनेचा उल्लेख कोठेही दिसत नाही. विरोधी पक्षाला या सरकारकडून केवळ महिन्याभरात किती अपेक्षा आहेत आणि या काळात शासनाने कोणते महत्वाच निर्णय घेतले हे देखील आम्ही शासनाच्या वतीने सांगणारच आहोत. मागील 15 वर्षात यांनी काय केले हे सांगण्याची मला या निमित्ताने चांगली संधी मिळणार आहे, विरोधकांचे 15 वर्षाचे हे पाप आता आम्हाला फेडावे लागणार आहे.माझा प्रस्तावाला विरोध नाही, तो आपण केव्हाही घेऊ शकतो आणि आमचीही त्या प्रस्तावाला उत्तर देण्याची तयारी आहे पण आज शोक प्रस्तावासारखा महत्वाचा विषय सभागृहासमोर असल्याने नियम 289 च्या सूचनेचा प्रस्ताव आपण फेटाळून लावावा, एवढीच मी विनंती करतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघापासून आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी विचारविनिमय करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये शोक प्रस्ताव देखील दाखविण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जी भूमिका मांडली आहे तीच भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची देखील आहे. या राज्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. एवढेच नव्हे तर फार मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करणे हे कोणालाही अभिप्रेत नाही. आज महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ.अंतुले साहेब, माननीय श्री.मुरली देवरा साहेब यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव आहे. ....(अडथळा).... आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाअन्वये सूचनेला पाठिंबा दिलेला आहे. नव्हे आमचा आग्रह आहे की, यावर आपण चर्चा घ्यावी. पण आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये शोक प्रस्ताव दाखविण्यात आला आहे. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावान्वरे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून चर्चा घेतो. सभापती महोदय, आजच्या कामकाजामध्ये प्रश्नोत्तरे दाखविण्यात आलेली नाहीत ही बाब आपण स्वत: सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. आज शोक प्रस्ताव आहे. शोक प्रस्ताव स्थगित करून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यास आपण अनुमती देणार आहात काय, हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या विषयासंबंधी देखील संवेदनशील आहोत आणि शोक प्रस्तावासंबंधी देखील संवेदनशील आहोत. नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव योग्य आहे किंवा नाही, हे मांडण्यासाठी परवानगी दिली जाणार असेल तर त्यासंबंधी देखील आम्ही बोलण्यास तयार आहोत. पण ते मर्यादेत असले पाहिजे. नाही तर मग सरळ चर्चाच घेतलेली बरी. शेवटी सभागृहाचा डेकोरम पाळला गेला पाहिजे. आजचा शोक प्रस्ताव देखील अतिशय महत्त्वाचा आहे. तेव्हा सभागृहाचा डेकोरम पाळावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी गंभीर प्रश्न निर्माण झाला असून त्यासंबंधी सर्वांनाच तळमळ आहे. ती तळमळ या सभागृहाच्या माध्यमातून व्यक्त करावयाची असून त्यासंबंधातील उत्तर देखील आपल्याला शासनाकडून घ्यावयाचे आहे. शेवटी सभागृहाचा डेकोरम देखील महत्त्वाचा आहे. सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री.सुनील तटकरे....

सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो आपण नाकारला. तरी सुद्धा सदर प्रस्ताव होतो किंवा नाही यावर चर्चा करण्यासाठी कालमर्यादा घातली नाही तर मग आपण प्रस्तावावर चर्चा घ्यावी. त्यामुळे मग शोक प्रस्ताव घ्यायचा किंवा नाही हे ठरवावे लागेल एवढ्याच भावना मला येथे व्यक्त करावयाच्या आहेत.

**सभापती** : माझ्याकडे जो प्रस्ताव दिला आहे तो नियम 289 अन्वयेच्या निकषात कसा बसतो हे सांगण्यासाठी मी 5-7 मिनिटांचा अवधी दिला होता. .....(अडथळा).... मी प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा होते. त्यावेळी मी आपल्याला आपले विचार मांडण्यास अनुमती देईन. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये शोक प्रस्ताव दाखविण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. आजचा शोक प्रस्ताव माजी मुख्यमंत्री श्री.अंतुले साहेबांच्या व माजी केंद्रीय मंत्री श्री.मुरली देवरा यांच्या दु:खद निधनासंबंधातील आहे. हा विषय देखील सभागृहाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, सुरूवातीला आपण तो प्रस्ताव नियम 289 चा कसा होतो यावरच मर्यादित स्वरूपात बोलतो. मी या प्रस्तावावर चर्चा करण्यास अनुमती दिली तर आपणा सर्वांना सविस्तर विचार मांडता येतील. यासंबंधी माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे पाटील यांनी देखील विचार मांडले आहेत. ज्यावेळी असे प्रस्ताव सदनामध्ये येतात तेव्हा दैनंदिन कामकाज तहकूब करून सदर विषय प्राधान्याने घ्यावे असे म्हटले जाते.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

हा विषय नियम 289 अन्वये कसा होतो यासंदर्भात सन्माननीय सदस्यांचे 5-10 मिनिटात मत जाणून घेतले जाते. या विषयाच्या संदर्भात सत्तारुढ पक्षाचे मत सुध्दा जाणून घेतले जात असते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या भागात मोठया प्रमाणात दुष्काळी परिस्थिती आहे. या चर्चेला मी तत्वत: मान्यता देणार आहे. दोन्ही बाजूचे मत जाणून घेऊन ही चर्चा नेमकी कधी घ्यावयाची याबाबत आपण निर्णय घेऊ. ही चर्चा आपल्याला नियम 260 अन्वये पूर्ण करावयाची आहे. नियम 260 अन्वये ही चर्चा कधी घ्यावयाची यावर विचारविनिमय करण्यासाठी मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.20 वाजता 30 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

श्री.देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.गिरीश भालचंद्र बापट यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.गिरीश दत्तात्रय महाजन यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.सुभाष राजाराम देसाई यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.रामदास गंगाराम कदम यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.एकनाथ संभाजी शिंदे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.बबनराव दत्ताराव लोणीकर यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, डॉ.दीपक रामचंद्र सावंत यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.राजकुमार सुदाम बडोले यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, प्रा.राम शंकर शिंदे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.संजय दुलीचंद राठोड यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, श्री.दादाजी दगडू भुसे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.विजय सोपानराव शिवतारे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.दीपक वसंत केसरकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.राजे अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव अत्राम यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.रवींद्र दत्ताराम वायकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, डॉ.रणजित विठ्ठलराव पाटील यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.प्रवीण रामचंद्र पोटे-पाटील यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशन करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो.

(1) श्री.रामनाथ मोते

(2) श्री.गोपीकिशन बाजोरिया

(3) श्री.जयवंतराव जाधव

(4) श्री.चंद्रकांत रघुवंशी

----------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

(पुढे सुरु.. ..)

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, श्री.दिवाकर नारायण रावते यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

-----------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री.मुरली सिताराम देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री व श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री.मुरली सिताराम देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री व श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स., यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री.मुरली सिताराम देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री व श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स., यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. बॅ. अब्दुल रहेमान अंतुले यांचा जन्म 9 फेब्रुवारी, 1929 रोजी रायगड जिल्ह्यात म्हसळा तालुक्यातील आंबेत येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.(ऑनर्स), बार-ॲट-लॉ पर्यंत झाले होते. कै. अंतुले यांनी गावसुधार नवजीवन समितीचे संस्थापक-चेअरमन, श्रीवर्धन-म्हसळे-मुरुड तालुका विकास मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, मुंबई येथील अंजुमन-इ-इस्लाम संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस व रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस तसेच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. रायगड जिल्ह्यातील तसेच मुंबई शहरातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांनी लिहिलेली "पार्लमेंटरी प्रिव्हिलेजेस्", "महाजन रिपोर्ट अन्कव्हर्ड", "अपॉईंटमेंट ऑफ ए चिफ जस्टीस" व "डेमॉक्रसि: पार्लमेंटरी ऑर प्रिसीडेंशिअल" ही पुस्तके खूप गाजली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.देवेंद्र फडणवीस....

कै. अंतुले साहेब सन 1962, 1967, 1972, 1980 व 1985 असे पाच वेळा रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी ऑक्टोबर 1969 ते मार्च 1972 या काळात शिक्षण, विधी व न्याय, मत्स्यव्यवसाय व बंदरे खात्याचे राज्यमंत्री तर मार्च 1972 ते फेब्रुवारी 1976 या काळात गृहनिर्माण, परिवहन, विधी व न्याय खात्याचे मंत्री म्हणून कार्य केले होते. तसेच 9 जून, 1980 ते 12 जानेवारी, 1982 या काळात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपदही त्यांनी भूषविले होते. त्यांनी मुख्यमंत्री पदाच्या काळात गडचिरोली, सिंधुदुर्ग, रायगड, जालना व लातूर या जिल्ह्यांची निर्मिती केली. पंचायत समिती निहाय तालुक्यांची निर्मिती केली. तसेच राज्यात हुतात्मा स्मारकांची उभारणी केली, संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी पेन्शन योजना सुरु केली. यासारखे जनहिताचे अनेक निर्णय घेवून राज्य शासनाचा कारभार गतिमान करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले होते.

कै. अंतुले सन 1976 मध्ये राज्यसभेवर निर्वाचित झाले होते. तसेच सन 1989, 1991, 1996 व 2004 असे चार वेळा कुलाबा मतदारसंघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. त्यांनी जून 1995 ते मे 1996 या काळात केंद्रीय मत्रिमंडळात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

महोदय, एक अत्यंत लोकाभिमुख आणि ज्यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना सन्मान मिळवून दिला असे नेतृत्व, ज्यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची संस्कृती अतिशय उज्ज्वल केली असे कुशल संघटक, उत्कृष्ट संसदपटू, अभ्यासू, कार्यक्षम, कर्तबगार व विकासाची दूरदृष्टी असणाऱ्या जनमानसातील ज्येष्ठ नेत्याचे मंगळवार, दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजी दु:खद निधन झ ााले.

कै. मुरली सिताराम देवरा माजी विधान परिषद सदस्य व माजी केंद्रीय मंत्री यांचा जन्म 10 जानेवारी, 1937 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. देवरा यांनी आयुर्विमा महामंडळाचे संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे अध्यक्ष, केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या स्थायी समितीचे समिती प्रमुख, ग्लोबल पार्लमेंटरी असोशिएशनचे उपाध्यक्ष, अर्थ विषयक सल्लागार समितीचे सदस्य तसेच जिनिव्हा येथील इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेडक्रॉसचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

..3..





श्री.देवेंद्र फडणवीस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै. देवरा सन 1968 ते 78 मुंबई महानगरपलिकेचे सदस्य तर 1977 मध्ये त्यांनी मुंबई महानगरपालिकेचे महापौरपदही भूषविले होते. तसेच सन 1981 ते 2003 पर्यंत मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. मुंबई शहरातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. देवरा सन 1982 मध्ये राज्यपालांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर नामनियुक्त झाले होते. तसेच 1985, 1989, 1991 व 1998 असे चार वेळा मुंबई दक्षिण मतदार संघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते. तर सन 2002, 2008 व 2014 असे तीन वेळा राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते. तसेच सन 2006 ते 2011 या काळात केंद्रीय मंत्रिमंडळात पेट्रोलियम मंत्री म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते.

महोदय, राज्यात आणि मुंबईत ज्यांना सन्मान होता अशा प्रकारचे कै.देवरा हे नेतृत्व होते. एक दीर्घ अनुभव असलेल्या या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार दिनांक 24 नोव्हेंबर, 2014 रोजी दु:खद निधन झाले.

कै. भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांचा जन्म 17 मे, 1932 रोजी सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यातील मलकापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले होते.

कै. शिंदे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत तसेच गोवामुक्ती संग्रामातही सक्रीय सहभाग घेतला होता.

कै. शिंदे यांनी मलकापूर येथील मळाई देवी शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, लक्ष्मी देवी विकास सोसायटीचे संस्थापक-चेअरमन, हनुमान दूध उत्पादक संस्थेचे संस्थापक-सदस्य, कराड सहकारी ऑईल मिल संस्थेचे-अध्यक्ष, महाबळेश्वर-पाचगणी डेव्हलपमेंट बोर्डाचे सदस्य तसेच कराड खाडसरी संस्थेचे चेअरमन म्हणूनही कार्य केले होते. मलकापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. "माय फ्रेंड" या नावानेच ते सर्वांना परिचित होते.

कै. शिंदे सन 1982 व 1988 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



श्री.देवेंद्र फडणवीस....

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजी दु:खद निधन झाले.

महोदय, सभागृहाच्या वतीने व व्यक्तीशः माझ्या वतीने मी या तीनही महनीय नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

--------------

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहेमान अंतुले साहेब, केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा साहेब व श्री. भास्कररावजी शिंदे या सन्माननीय नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी मांडला आहे. या शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बॅ. अंतुले साहेबांचा आणि माझा जवळचा संबंध राहिला आहे. जवळपास 44-45 वर्षांपूर्वी सन 1968 मध्ये पहिल्यांदा बॅ. अंतुले साहेबांचे व्यक्तिमत्व पाहण्याची संधी मला मिळाली. ते आणि कै. युसूफभाई हाफिज हे विधानसभा सदस्य राहिले. माझे वडील सभापती असल्यामुळे आमच्या घरामध्ये वडिलांना भेटण्यासाठी बॅ. अंतुले साहेब आले होते. लहानपणी मी त्यांना पहिल्यांदा पाहिले. त्यावेळी मला बॅ. अंतुले साहेबांचे व्यक्तिमत्व जवळून पाहण्याची संधी मिळाली. गेली अनेक वर्षे मी त्यांच्या सहवासात अनेक क्षण घालविले असल्यामुळे आज या ठिकाणी त्यांच्या संदर्भातील भावना व्यक्त करताना ते क्षण माझ्या नजरेसमोर येत आहेत. बॅ. अंतुले साहेबांचा जन्म सावित्रीच्या तिरावर असलेल्या आंबेत या छोट्याशा गावामध्ये झाला. त्या गावामध्ये त्यावेळी साधा रस्ता नव्हता किंवा कोणत्याही प्रकारची सुविधा नव्हती. अशा छोट्याशा गावामध्ये, गरीब कुटुंबामध्ये जन्माला आलेले हे व्यक्तिमत्व होते. आपल्या बुध्दिमान, बुध्दिमत्तेने प्रखर आत्मविश्वासाने गरिबीचे चटके सहन करीत त्यांनी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने त्यांचे पितृछत्र लवकर हरपले. परंतु, त्यांच्या आईने त्यांच्यावर केलेल्या संस्काराच्या माध्यमातून त्यांनी घेतलेले उच्च शिक्षण ही त्यांच्या जीवनाची एक शिदोरी ठरली. आंबेत सारख्या छोट्याशा गावामध्ये सार्वजनिक जीवनात काम करण्याची मानसिकता त्यांनी दाखविली. पकटीपासून सार्वजनिक जीवनाला त्यांनी सुरूवात केली. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे, ज्या छोट्याशा गावामध्ये त्यावेळी रस्ता नव्हता, कोणतीही सुविधा नव्हती, त्या गावापासून त्यांनी कामाची सुरूवात केली. शेजारी असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या पलीकडील मंडणगड तालुक्यात जायचे असेल तर त्या ठिकाणी पकटी असली पाहिजे, असा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यापासून त्यांनी सार्वजनिक जीवनाची सुरूवात केली. बॅरिस्टर होण्याची त्यांची इच्छाशक्ती प्रबळ राहिली. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी विलायतेमध्ये जाऊन शिक्षण घेतले. त्यावेळी लंडनमध्ये शिक्षण घेत असताना त्यांचा इंदिराजींशी परिचय झाला.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

बॅ. अंतुले साहेब शिक्षण घेऊन पुन्हा देशात आले. त्यांच्याकडे प्रखर बुध्दिमत्ता व उत्तम युक्तिवाद करण्याची कला असल्यामुळे ते न्यायालयात सुध्दा वकिली करू शकले असते. परंतु, समाज जीवनाचा वसा त्यांना त्यांच्या आईकडून लाभला असल्यामुळे सामाजिक कार्य अविरतपणे चालू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली. सन 1957 मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर काँग्रेस पक्षाचे तिकीट मिळविण्यासाठी त्यांनी पेण जिल्हा काँग्रेस कमिटीकडे अर्ज केला. त्यावेळी ते नुकतेच बॅरिस्टर झाले होते. ते तिकिटासाठी काँग्रेस कमिटीच्या दरवाजात गेले असता त्यांना प्रश्न विचारला गेला की, तुम्ही कोण ? त्यावेळी त्यांनी स्वत:ची ओळख करून दिली. परंतु, सन 1957 मध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांना सांगितले की, तुम्ही काँग्रेसचे साधे सभासद नाही. त्यामुळे तुम्हाला तिकीट मागण्याचा हक्कही नाही. पहिल्यांदा सभासद व्हा आणि नंतर तिकीट मागण्यासाठी या. काँग्रेसच्या नेत्यांनी व काँग्रेसच्या घटनेने देखील त्यांना असे सुनावले.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.........

परंतु, प्रखर इच्छाशक्ती कशी असते ते पहा. सन 1957 च्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने त्यांना तिकीट नाकारले. त्या वेळी एका मतदारसंघातून दोन लोकप्रतिनिधी निवडून यायचे. श्रीवर्धन आणि माणगाव या दोन मतदारसंघातील एक मतदारसंघ राखीव आणि दुसरा सर्वसाधारण प्रवर्गासाठी होता. त्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने श्रीवर्धन मतदारसंघासाठी श्री.दादासाहेब देशमुख यांची उमेदवारी घोषितही केली होती व त्यांचा प्रचारही सुरु झाला होता. या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर झालेला असताना स्व.इंदिरा गांधींशी त्यांच्या असलेल्या निकटच्या संबंधामुळे बॅ.अंतुले साहेबांनी उमेदवारी मिळविली. दुर्दैवाने त्या निवडणुकीत त्यांना यश मिळू शकले नाही. परंतु, अपयशामुळे खचून न जाता सामाजिक सेवा सुरु ठेवली पाहिजे, जीवनात यश, अपयश या नाण्याच्या दोन बाजू आहेत, पुढच्या निवडणुकीत जिंकता येईल, हार पत्करावी लागली तरी आपला सार्वजनिक जीवनातील सहभाग तेवढाच ठेवला पाहिजे, अशी मनस्वीपणाची भूमिका अंतुले साहेबांनी स्वीकारली. त्यानंतर पुन्हा त्यांना सन 1965 च्या निवडणुकीत उमेदवारी मिळाली आणि त्या निवडणुकीत ते निवडून आले. बॅरिस्टरची पदवी प्राप्त केलेल्या या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने श्रीवर्धन सारख्या दूरवरच्या भागात जाऊन सेवा करण्याची मानसिकता दाखविली. त्यानंतर सन 1967 च्या निवडणुकीत काँग्रेसविरोधी वातावरण असताना सुध्दा त्यांनी यश मिळविले होते.

सभापती महोदय, मी अंतुले साहेबांना सन 1968 मध्ये पहिल्यांदा पाहिले. सन 1969 मध्ये स्व.वसंतराव नाईक साहेबांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्याचे स्व.वसंतराव नाईक आणि स्व.यशवंतराव चव्हाण यांनी ठरविले होते. त्यावेळी आपल्या राज्यात मंत्रिमंडळात 'राज्यमंत्री' हे पद नव्हते. 'मंत्री' आणि 'उप मंत्री' अशी पदे होती. परंतु, बॅरिस्टर साहेबांनी असा आग्रह धरला की, "नाईक साहेब आपण मला मंत्रिमंडळात स्थान देणार असाल तर मला उप मंत्री व्हायचे नाही, मला मंत्रिमंडळात घ्यायचे असेल तर 'राज्यमंत्री' म्हणून घ्या." त्याप्रमाणे त्यांचा राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला. अशारितीने राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री पद बॅ.अंतुले साहेबांमुळे निर्माण झाले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. प्रबळ इच्छाशक्ती आणि राजकीय विचार कसे असू शकतात, स्पष्टपणे भूमिका मांडण्याचे धाडस कसे असू शकते, हे अंतुले साहेबांसारख्या नेतृत्त्वाने सन 1969 मध्ये दाखवून दिले.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, मला आठवते की, सन 1969 मध्ये अंतुले साहेब मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा आंबेतला घरी जात असताना कोलाडच्या नाक्यावर ज्या ठिकाणी आपणही आला होता, त्या नाक्यावर त्यांचा पहिला सत्कार माझ्या वडिलांनी केला होता. त्यावेळी अंतुले साहेबांचे मराठी एवढे चांगले नव्हते. त्यामुळे ल, ल करीत त्यांनी दोन-चार मिनिटे भाषण केले. त्यानंतर त्यांनी प्रशासनाचा वकूब अशा पध्दतीने दाखविला, मराठीवर अशा उत्तम पध्दतीने प्रभुत्त्व मिळविले की, त्यानंतरच्या काळात बॅ.अंतुले साहेबांची अस्खलित मराठीतील भाषणे संपूर्ण महाराष्ट्राने आणि देशाने अनुभवली.

सभापती महोदय, सन 1969 ते सन 1972 या कालखंडात त्यांनी कुलाबा जिल्ह्यात आणि संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळ्या प्रकारचा दबदबा निर्माण केला. मघाशी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे त्यावेळी ते कायदा खात्याचे राज्यमंत्री होते. सन 1972 मध्ये स्व.वसंतराव नाईक साहेबांनी त्यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश केला. ते सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री झाले. त्यावेळी ॲडव्होकेट जनरल यांना बदलण्याचे धाडस त्यांनी दाखविले. अशा अनेक गोष्टी अंतुले साहेबांच्या आयुष्यात घडल्या. त्यामधील प्रत्येक गोष्ट कदाचित वादग्रस्त ठरली असेल. पण त्या गोष्टी करण्यासंबंधीचा मनोनिग्रह ज्या नेतृत्त्वाने दाखविला त्याचे स्मरण आजच्या प्रसंगी करणे मला आवश्यक वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून त्यांना सन 1972 ते 1975 असा तीनच वर्षांचा कालखंड मिळाला. सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी अनेक योजना राबविण्याचा प्रयत्न केला. आज आमचे सन्माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील हे बांधकाम मंत्री आहेत. सन 1961 ते 1982 चा आराखडा आणि सन 1981 ते 2001 चा आराखडा आपल्याला माहीत आहे. साधारणपणे 20 वर्षांचा रस्त्यांचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार केला जात असतो. तीन वर्षाच्या मंत्री पदाच्या कारकिर्दीत सन 1981 ते 2001 चा आराखडा तयार करीत असताना उभ्या महाराष्ट्रातील आणि कोकणातील प्रत्येक रस्त्यांचा त्यांनी बारकाईने विचार केला. कारण ज्या रस्त्यांचा समावेश रस्ते विकास योजनेमध्ये होत नाही ती कामे नॉनप्लॅनशिवाय करता येत नाहीत. म्हणूनच मग राज्यमार्ग, मुख्य जिल्हा रस्ते,

...3....

श्री.सुनील तटकरे..........

इतर जिल्हा रस्ते, असे रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी सन 1981 ते 2001 चा आराखडा अशा पध्दतीने तयार केला की, महाराष्ट्रातील कोणतीही वाडीवस्ती शिल्लक राहणार नाही. अशा प्रकारचा सर्वंकष आराखडा तयार करण्याची भूमिका त्यांनी त्या काळात घेतली.

सभापती महोदय, कोकणचा कॅलिफोर्निया करण्याबाबतची भूमिका पहिल्यांदा बॅ.अंतुले साहेबांनी त्या कालखंडात मांडली. चांद्यापासून बांद्यापर्यंत अशी महाराष्ट्राची ओळख आहे तशीच रेवस पासून रेडी पर्यंत कोकणाची ओळख आहे आणि म्हणूनच रेवस पासून रेडी पर्यंत सागरी महामार्ग तयार करण्याची कल्पना पहिल्या प्रथम त्यांनी मांडली.

यानंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:10

श्री. सुनील तटकरे...

त्यावेळी कुलाबा जिल्हा आणि शेजारचा रत्नागिरी जिल्हा हे दोन जिल्हे एकत्रित होते. आज सिंधदुर्ग जिल्हा झालेला आहे. तुमच्या आमच्या महाराष्ट्राला एकमेव सागरी किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही जिल्ह्याला सागरी किनारा लाभलेला नाही. सागरी महामार्गाची कल्पना त्यांनी केवळ मनामध्ये ठेवली नाही तर ती कृतीमध्ये आणण्यासाठी त्या काळामध्ये मोठया प्रमाणावर प्रयत्न केले. 1972 ते 1975 हा कुलाबा जिल्ह्यासाठी फार महत्वपूर्ण काळ ठरला. माणसाच्या जीवनामध्ये असे अनेक प्रसंग येतात की त्यावेळी त्यांच्या मनाची कसोटी लागत असते. दुर्दैवाने वडखळ नाक्याचे प्रकरण त्या काळामध्ये निर्माण झाले. त्या प्रकरणामुळे त्यांची वेगळी प्रतिमा निर्माण झाली. एक स्पष्ट चित्र लोकांसमोर यावे म्हणून दोन्ही सभागृहाची संयुक्त चिकित्सा समिती नेमून वडखळ नाक्याच्या प्रकरणाची चौकशी करावी असा आग्रह तत्कालीन मुख्यमंत्र्यासमोर धरला गेला. विधानसभेतील तत्कालीन सन्माननीय सदस्या श्रीमती मृणालताई गोरे यांच्यासह विधानपरिषदेतील काही सन्माननीय सदस्यांची संयुक्त चिकित्सा समिती नेमण्यात आली आणि त्या समितीचा अहवाल सभागृहापुढे मांडण्यात आला. त्या चौकशीमध्ये बँ अंतुले साहेब हे निर्दोष असल्याचे सिद्ध झाले. राजकारणामध्ये काही वेळा अनेक गोष्टी घडत असतात. अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस या नात्याने त्यांना काम करण्याची संधी मिळाली. ते राज्यसभेवर गेले. 1980 साली ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यासंबंधी लोकसत्ता दैनिकामध्ये सविस्तर वृत्त छापून आलेले आहे. माझ्या सारख्या कार्यकर्त्याने बॅ. अंतुले साहेबांच्या तोंडून अनेक वेळा ऐकले आहे की, 1977 साली आणीबाणी नंतर काँग्रेसचा पराभव झाला. त्यानंतर इंदिरा गांधींनी बॅ. अंतुले साहेबांच्या घरामध्ये काँग्रेस-आय पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. हे बॅ. अंतुले साहेबांनी अनेक वेळा जाहीरपणे सांगितलेले आहे. माझ्या सारख्या कार्यकर्त्याला सुध्दा त्यांनी हे अनेक वेळा सांगितले. 1980मध्ये त्यांची राज्याची मुख्यमंत्री म्हणून निवड करण्याचे निश्चित झाले होते. परंतु ती निवड होऊ नये या दृष्टीने शेवटच्या क्षणी काही फेरबदल झाले. ए.बी.शर्मा नावाचे निरीक्षक दिल्लीहून येणार होते. ते हवाई उड्डाण खात्याचे मंत्री होते. ते त्या खात्याचे मंत्री असताना देखील त्यांचे विमान मुंबईमध्ये उतरणार नाही याची खबरदारी संजय गांधी यांनी घेतली होती. त्यामुळे अंतुले साहेबांना मुख्यमंत्री पद मिळाले. त्यांचे नेतृत्व प्रभावी होते. संजय गांधी यांचा आणि अंतुले साहेबांचा निकटचा संबंध होता. लंडनमध्ये शिक्षण घेत असताना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

त्यांची पहिली भेट झाली होती. मुख्यमंत्री पदाचा निर्णय बदलला जात असल्याचे लक्षात आल्यानंतर योग्य तो समन्वय साधून संजय गांधी यांनी अंतुले साहेबांची मुख्यमंत्री पदी निवड निश्चित केली. पूर्वी फक्त अधिवेशन चालू असताना आमदारांना मान असायचा. पण आज आमदारांना जो काही मान मिळत आहे तो अंतुले साहेबांनी घेतलेल्या निर्णयामुळे मिळत आहे. आमदार जिल्हाधिका-यांकडे गेल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी उठून त्यांचे स्वागत केले पाहिजे, सर्व अधिकाऱ्यांनी आमदारांशी सन्मानाने वागले पाहिजे असे परिपत्रक अंतुले साहेबांच्या काळात काढण्यात आले. आमदारांना पूर्वी अधिवेशन कालावधीत पाचपन्नास रुपये भत्ता मिळत होता. ज्या ज्या वेळी आमदार मुंबईला येत असत त्याच वेळी त्यांना आमदार निवासातील रुम मिळत होती. तीन दिवसानंतर आमदारांना ती रुम सोडून परत जावे लागत होते. आमदारांना स्वीय सहायकाची सोय नव्हती. आमदारांचा मान आणि प्रतिष्ठा वाढविण्याचे काम सर्वप्रथम अंतुले साहेबांनी केले. आमदारांना त्यांच्या मतदारसंघामध्ये फिरण्यासाठी महिन्यातील 15 दिवस शासकीय गाडी तहसीलदारांनी उपलब्ध करुन दिली पाहिजे अशा प्रकारचे शासकीय आदेश त्यांनी काढले. संजय गांधी निराधार योजना, संजय गांधी स्वावलंबन योजना, कर्ज माफी यासंबंधी त्यांनी धाडसी निर्णय घेतले. कर्ज माफीसंबंधी रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरने नापसंती दर्शविली त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असून महाराष्ट्राच्या तिजोरीबाबत काय करायचे हा माझा अधिकार आहे तो रिझर्व्ह बँकेचा अधिकार नाही असे बॅ. अंतुले साहेबांनी सांगितले. वेगवेगळया योजनांची अंमलबजावणी करणारे ते एक गतिमान नेतृत्व होते. दीड वर्षाच्या कालावधीतच त्यांना मुख्यमंत्री पदावरुन पायउतार व्हावे लागले. राजकारणामध्ये अनेक आरोप प्रत्यारोप होत असतात. अशा वेळी त्यांची खरी कसोटी लागत असते. दीड वर्षाच्या कालावधीत मुख्यमंत्री म्हणून त्यांनी गतिमान प्रशासन चालविले. संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून त्यांनी पेशन योजना सुरु केली. ते एकदा मराठवाड्याच्या दौऱ्यावर असताना त्याना 60-70 वर्षाची वृद्ध माता भेटली. त्या वृद्ध मातेला मुख्यमंत्र्यांचे सुरक्षा कवच त्यांच्या पर्यंत पोहोचू देत नव्हते. अंतुले साहेबांनी त्या महिलेला बोलावून तुमचे काय काम आहे अशी विचारणा केली. त्या महिलेने सांगितले की, मला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळत नाही, कारण मला निजामाच्या राजवटीतील पेन्शन मिळते. मग अंतुले साहेबांनी तिला विचारले की, एक पेन्शन मिळत असताना दुसऱ्या पेन्शनची गरज काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

ती म्हणाली, तेच तुम्हाला सांगायला आले आहे. मला पेन्शन मिळते फक्त एक रुपया. राज्य शासनाची संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पेन्शन 100 रुपये दिली जाते. परंतु मला एक पेन्शन मिळत असल्यामुळे राज्य शासनाची पेन्शन मिळण्यास मी पात्र नाही. त्यांनी तेथूनच राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव श्री.गवई यांना फोन लावला आणि आज सायंकाळपर्यंत मला शासनाचा आदेश कळला पाहिजे, मी औरंगाबाद येथे मुक्कामी असून आजच सुधारित आदेश निर्गमित झाला पाहिजे असे सांगितले. त्याप्रमाणे राज्य सरकारने सुधारित आदेश जाहीर केले. अशा पध्दतीने अनेक गरीब निराधार वृध्द लोकांना 100 रुपये दरमहा पेन्शन सुरु करण्याबाबत राज्य सरकारकडून पावले उचलली गेली.

सभापती महोदय, गतीमान प्रशासन मी जवळून पाहिले आहे. मला फार जवळून त्यांचा सहवास लाभला. माझ्या वडिलांचा त्यांच्याशी दीर्घ परिचय असल्यामुळे त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी लाभली. ज्यावेळेला ते केंद्रीय आरोग्यमंत्री झाले त्या काळात संपूर्ण देशामध्ये एकाच दिवशी 5 वर्षाच्या आतील बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्याची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात अंमलात आणली. अशा असंख्य आठवणी या निमित्ताने सांगता येण्यासारख्या आहेत. त्यांनी केलेले अजोड कार्य आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, राजकारणाच्या अखेरच्या कालखंडात दुर्दैवाने त्यांच्याशी माझा निकटचा संबंध राहू शकला नाही. तरी सुध्दा प्रेम, सौहार्दाचे संबंध राहिले. त्यांचा स्वभाव करारी होता. एखादा निर्णय घेण्याची त्यांच्यामध्ये विलक्षण हातोटी होती. 1992 मध्ये पहिल्यांदा जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या. सभापती महोदय, आपल्याकडे त्यावेळी राज्याच्या ग्रामविकास मंत्री पदाचा कारभार होता. 13 वर्षाच्या कालखंडानंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या होत्या. काँग्रेस पक्षाच्या वतीने पहिल्यांदा ते उरणमध्ये आले आणि त्यांनी सभेमध्ये जाहीर केले की, रायगड जिल्हा परिषद काँग्रेस पक्षाकडे येईल आणि सुनील तटकरे जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होईल.

उरण येथील पहिल्या राजकीय सभेत त्यांनी ते भाषण केलेले होते. कुलाबा जिल्हयाचे 'रायगड' म्हणून नामांतर करण्यासाठी 1980 मध्ये त्यांनी निर्णय घेतला. त्यांनी कुलाबा जिल्हयाचे नामांतर केले व काही जिल्हयांची नव्याने निर्मिती केली. मंत्रालयाच्या मुख्य प्रवेश

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

द्वाराजवळील छत्रपती शिवरायांच्या तैलचित्राला मुजरा करुनच मंत्र्यांनी आपले काम सुरु करावे असे त्यांनी मंत्रिमंडळाला सूचित केले होते. शिवप्रभुंना अभिप्रेत असलेले राज्य महाराष्ट्रामध्ये असावे अशी त्यांची कल्पना होती.

सभापती महोदय, भवानी तलवार आणण्यासाठी लंडन येथे जाऊन ब्रिटनच्या राणीची त्यांनी भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना राजीनामा द्यावा लागल्यामुळे त्यांच्या मनामध्ये भवानी तलवार आणण्यामध्ये यशस्वी न ठरल्याबद्दल कायम रुखरुख राहिली होती. निवडणुकांमध्ये यश अपयश हे येत असते. लोकसभेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराकडून त्यांचा पराजय झाला. मी त्यावेळी विधानसभेचा सदस्य होतो. मी त्यांच्या खूप जवळ होतो. त्यामुळे माझ्‍यासारख्यांना अश्रू आवरले नाहीत. परंतु त्यांनी स्पष्ट सांगितले की, डोळ्यात अश्रू येऊन उपयोग नाही. आपल्यासोबत काम करणाऱ्या हजारो लोकांच्या फौजा असतात, त्यांनी त्यांचा आत्मविश्वास गमावला तर संघटना उभी राहू शकत नाही. अशा प्रकारचे धाडस त्यांनी दाखविले होते. असे एक मोठे नेतृत्व आपण गमावले आहे.

सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना एक विनंती करु इच्छितो. यामध्ये टीकाटिप्पणी करण्याचा हेतू नाही. परंतु सरकारच्या प्रशासनातील शैथिल्य सभागृहासमोर आणण्याचा मी प्रयत्न करीत आहे. सकाळी 10.00 वाजता बॅ.अंतुले यांचे निधन झ ाले. राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यासाठी, शासकीय दुखवटा जाहीर करण्यासाठी तसेच शासकीय इतमामात अंत्यसंस्कार जाहीर करण्यासाठी पाच तासांचा कालावधी लागला. माननीय मुख्यमंत्री अंत्यसंस्काराच्या वेळी तेथे आले होते त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु शासकीय दिरंगाई कशाप्रकारे होऊ शकते हे आपल्या निदर्शनास आणतो. यापुढे असे घडू नये याची खबरदारी घेण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सागरी महामार्गाची कल्पना बॅ.अंतुले यांनी आणली. आज ती पूर्णत्वास येत आहे. मला राज्याचा अर्थमंत्री म्हणून या सागरी महामार्गावरील दोन पूल उभारण्याची संधी मिळाली. बाणकोट खाडीवरील पूल हा त्यापैकी एक आहे.

नंतर श्री.खर्चे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

मुंबई ते कोकणपट्टी या भागात जो एकमेव सागरी महामार्ग आहे त्याला बॅ. अंतुले साहेबांचे नाव द्यावे आणि उंच स्मारक उभारावे अशीही मागील या निमित्ताने मी करणार आहे. सत्ता येते आणि जाते, अनेकांना अनेक वेळ उपभोगायला ती मिळते पण किती काळ जगला यापेक्षा कसा जगला याला महत्व असते म्हणून बॅ. अंतुले साहेबांनी ज्या पध्दतीने राज्यात आणि केंद्रात काम केलेले आहे त्याचा सन्मान राखून या सागरी महामार्गाला त्यांचे नाव देऊन त्यांचा उचित सन्मान करावा अशी भावना मी या निमित्ताने व्यक्त करीत आहे.

महोदय, मुंबईचे एक उत्तुंग व्यक्तिमत्व मुरली देवरा यांचे होते. पूर्वी ज्याप्रमाणे स.का.पाटील व रजनी पाटील यांच्यासारख्या नेत्यांचा एक विलक्षण व वेगळाच प्रभाव मुंबईवर होता तसेच मुरली देवरा यांनी देखील त्यांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. दक्षिण मुंबईतून लोकसभेवर निवडून गेले, केंद्रीय मंत्रीपदाचा कार्यभार सांभाळला तसेच राज्यसभेच्या माध्यमातून देखील अनेकांना काम करण्याची संधी त्यांनी उपलब्ध करुन देण्याची भूमिका घेतली, अशा नेतृत्वाला मी या निमित्ताने श्रध्दांजली अर्पण करतो.

महोदय, भास्करराव शिंदे यांचा आणि माझा फारसा परिचय नसला तरी नगर जिल्ह्यातील एक माठे व्यक्तिमत्व म्हणून ते ओळखले जात होते. अशा थोर नेत्यालाही मी श्रध्दांजली अर्पण करतो.

शेवटी बॅ. अंतुले साहेबाना विनम्रपणे अभिवादन करीत असताना त्यांचे विचार, गरिबांसाठी त्यांची असलेली तळमळ ती तशाच पध्दतीने चालू ठेवण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी केला पाहिजे. ते ज्या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून येत होते त्या मतदारसंघाचे नेतृत्व माझा पुतण्या आज करीत आहे. त्याचप्रमाणे मा. श्री. शरदचंद्र पवार साहेब आणि अंतुले साहेबांचे फार जवळचे संबंध होते. अंतुले साहेब जेव्हा प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस होते तेव्हा पवार साहेब युथ काँग्रेसचे अध्यक्ष होते. बॅ. अंतुले साहेब सरचिटणीस पदावरुन पायउतार झाल्यानंतर पवार साहेब सरचिटणीस झाले. मला चांगले आठवते की, 1976 मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीमध्येच अंतुले साहेब गेल्यानंतर पवार साहेब रायगड जिल्ह्याचे पालक मंत्री होते. अशा थोर व्यक्तिमत्व असलेल्या नेत्याला मी मा. पवार साहेबांच्या व माझ्या पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते मा. मुख्यमंत्री यांनी बॅ. ए.आर.अंतुले, माजी केंद्रीय मंत्री व श्री. मुरली देवरा तथा माजी विधानपरिषद सदस्य श्री. भास्करराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणलेले आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बॅ. अंतुले साहेबांच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी अतुलनीय असे कार्य केले व याबद्दलची जाणीव राज्यातील संपूर्ण जनतेला आहे. अंतुले साहेबांचे शिक्षण बी.ए.(ऑनर्स) आणि बॅरिस्टरपर्यंत झालेले होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अतिशय वेगाने पक्षाचे काम देखील केले. राज्यात ते प्रथम कॉंग्रेस पक्षाचे युवा अध्यक्ष असताना त्यानी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षपद, त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सदस्य म्हणून देखील त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यांच्याकडे अनेक संघटनात्मक पदे चालून आली होती. राज्य व देशस्तरावर संघटना मजूबत करण्यासाठी अनेक पावले टाकली होती. महाराष्ट्रामध्ये देखील मजूबत काँग्रेस असली पाहिजे याचा ते नेहमी विचार करीत असत. राज्यात काँग्रेसमुळे स्थैर्य लाभणार असल्यामुळे गरीब माणसांकडे आपण अधिक लक्ष दिले पाहिजे या विचारसरणीतून त्यांनी संघटनेमध्ये आणि प्रशासनामध्ये काम केले. श्री.अंतुले साहेब श्रीवर्धन मतदार संघातून जवळ जवळ 5 वेळा निवडून आले होते. त्यानंतर 1980 मध्ये ते मुख्यमंत्री झाले. ते मुख्यमंत्री झा ल्यानंतर महाराष्ट्राच्या जनतेला खऱ्या अर्थाने त्यांची ओळख झाली. त्यांना मुख्यमंत्री म्हणून काम करण्यासाठी अल्प कालावधी मिळाला. त्यावेळी गरीब माणूस हा त्यांचा केंद्रबिंदू होता. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे श्री.अंतुले यांचे उजवे हात म्हणून ओळखले जात असे. त्यांनी स्थानिक व जिल्हा पातळीसह संपूर्ण कोकणामध्ये आपुलकी निर्माण केली होती. त्यांनी तरूणांना वाव देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यातूनच श्री.सुनीलजी तटकरे यांचे नेतृत्त्व उदयाला आलेले आपण पहात आहोत. तरूणांना वाव देण्यामध्ये ते सदैव पुढे असायचे. गरिबांसाठी योजना राबविण्याचे ध्येय समोर ठेवून मुख्यमंत्री पद त्यांनी सांभाळले. आताच सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे यांनी एका मुद्दाचा उल्लेख केला आहे. महाराष्ट्रामध्ये गरिबांना न्याय देणारी कुठली योजना असेल तर ती म्हणजे संजय गांधी स्वावलंबी निराधार योजना. त्यावेळी तरूणांना विनातारण बँकेचे कर्ज मिळत नव्हते. तरूणांना विनातारण रूपये अडीच हजार पर्यंत कर्ज मिळायला पाहिजे म्हणून त्यांनी स्वालंबी योजना देखील सुरू केली. त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये तालुके होते. परंतु, विदर्भामध्ये तालुक्यांची संख्या फार कमी होती. विदर्भात प्रत्येक ठिकाणी ब्लॉक नसायचा. त्यामुळे विदर्भात सगळ्या ठिकाणी कार्यालये करण्याचा निर्णय श्री.अंतुले यांनी घेतला. नुसता निर्णय न घेता त्यांनी एक ते दीड महिन्यामध्ये त्या इमारती बांधून देखील घेतल्या. त्यावेळचा काळ आपणा सर्वांना आठवत असेल. अत्यंत वेगाने आणि धाडसाने त्यावेळी त्यांनी काम केले होते. आपण स्वातंत्र्य सैनिकांचा देखील उपयोग करतो. सैनिकांची चिरकाल आठवण रनहावी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

म्हणून नप्रत्येक ठिकाणी त्यांनी अनेक शहीद स्मारके बांधली आहेत. अशा प्रकारे त्यांची दूरदृष्टी होती. राज्य आणि देशस्तरावर त्यांनीअत्यंत मौलिक असे काम केले. त्यांचे राज्याला सातत्याने मार्गदर्शन मिळाले. युथ काँग्रेस पासून ते देशस्तरावरील कॉग्रेसमध्ये त्यांनी काम केले आहहे. एक आमदार या नात्याने त्यांनी राज्य व देशस्तरावर काम केले असून त्याचा उल्लेख येथे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर केंद्रीय मंत्री असताना सुद्धा ते एकटे कसे काम करायचे याचा देखील श्री.सुनील तटकरे यांनी केला आहे. त्यांना दूरदृष्टी होती. ते काँग्रेस पक्षाचे महान नेते म्हणून श्री.अंतुले यांच्याकडे सातत्याने पाहिले जात असे. काँग्रेसमध्ये देशस्तरावर जे काही नेतृत्त्व होते त्यापैकी एक अग्रगण्य नेतृत्त्व श्री.अंतुले साहेब करीत होते. ते अनेक गोष्टींमुळे प्रसिद्ध होते. त्यावेळी देखील ते जनता दरबार भरवत असत. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळातील काही बातम्या देखील ऐकायचो. नागपूरचे अधिवेशन असले की, त्यावेळी देखील त्यांच्या जनता दरबारात 400 ते 500 लोक जमायचे.

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .. ..

जनता दरबारात 3-3,4-4 तास उभे राहून ते सर्वांचे म्हणणे समजावून धेऊन त्याप्रमाणे काम करीत असत. कोणी मदतीसाठी आला असेल तर त्याला तातडीने मदत उपलब्ध करुन देत असत. शिक्षणासाठी परदेशी जावयाचे असेल तर त्यासाठी सुध्दा ते लागेल ती मदत तत्काळ उपलब्ध करुन देत असत.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधींना खऱ्या अर्थाने सन्मान मिळवून देण्याचे काम कोणी केले असेल तर ते अंतुले साहेबांच्या कालावधीत झालेले आहे. एखादा आमदार जिल्हाधिकाऱ्याकडे गेला तर आमदाराला फारसे महत्व दिले जात नसे. त्यामुळे माननीय अंतुलेसाहेबांनी आमदारांचा मानसन्मान वाढण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. माननीय अंतुले साहेबांच्या काळापासून आमदारांचा राजशिष्टाचार पाळला जात आहे हे आपल्या कोणालाही विसरता येणार नाही.

माननीय अंतुले साहेबांना गरिबांबद्दल फार आपुलकी होती. संजय गांधी निराधार योजना, स्वावलंबी योजना, रेशन दुकानात कमी दराने धान्य उपलब्ध करुन देण्याची सुरुवात माननीय अंतुले साहेबांनीच केली होती. त्यांनी मुख्यमंत्रीपदाच्या काळात फार कामे केली होती.

अगोदर संपूर्ण देशात शेतकऱ्याला कर्ज माफी दिली जात नव्हती. राज्यातील 7 कोटी अल्पभूधारक शेतकरी कर्जबाजारी झालेला असताना त्यांनी बँकेच्या माध्यमातून कर्जाचा बोजा उचलून कर्ज बाजारी शेतकऱ्यांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यांनी त्यावेळी कर्जबाजारी अल्पभूधारक शेतकऱ्यांना जवळ जवळ 57 कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. या कर्जमाफीचा राज्यातील 6.5 कोटी अल्पभूधारक शेतकऱ्यांना फायदा झाला होता. या प्रकरणाचा धागा पकडून शेतकऱ्यांना वेळोवेळी कर्जमाफी दिली जाऊ लागली. शेतकरी कर्जबाजारी असेल तर अशा शेतकऱ्याला बँकेचे कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकरी विकासापासून वंचित राहतो. कर्जबाजारी शेतकऱ्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे कर्ज उपलब्ध व्हावे यासंदर्भात त्यांच्या कालावधीत महत्वपूर्ण निर्णय घेतले गेले होते.

पोलिओ निर्मूलनाच्या संदर्भात या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी अंतुले साहेबांचा उल्लेख केला आहे. संपूर्ण देशातून पोलिओचे निर्मूलन होण्यासाठी त्यांनी एकाच दिवशी सर्व ठिकाणी कॅम्प राबवल्यामुळे आपला देश पोलिओमुक्त होऊ शकला व ते केवळ माननीय अंतुले साहेबांच्या अथक प्रयत्नामुळेच शक्य झाले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .. ..

माननीय अंतुले साहेबांच्या आठवणी आपल्या सर्वांच्या मनामध्ये आहेत. नवीन सन्माननीय सदस्यांनी माननीय अंतुले साहेबांच्या आठवणी वाचल्या असतील, ऐकल्या असतील. परंतु माननीय अंतुले साहेबांचा कालावधी आपल्या डोळयाने पाहणारे अनेक सन्माननीय सदस्य आहेत. माननीय अंतुले साहेबांनी कमी कालावधीत जेवढे धाडसी निर्णय घेतले तेवढे निर्णय, कमी कालावधीत या राज्यात यापूर्वी तरी घेतले गेले नाहीत.

माननीय अंतुले साहेबांना माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी अंतुले साहेबांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासनाच्या वतीने कमिटी स्थापन करण्याची जी सूचना केली आहे ती फार चांगली आहे. मुंबईतील सागरी सेतूला माननीय अंतुले साहेबांचे नाव द्यावे अशी सूचना या ठिकाणी करण्यात आली आहे. सागरी सेतू पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे. परंतु इतर कामाला अंतुले साहेबांचे नाव दिले तर ते चांगले होईल. माननीय अंतुले साहेबांनी दीपस्तंभासारखे काम केले असून त्यांची आठवण आपल्या सर्वांच्या मनात चिरंतन रहावी यासाठी अंतुले साहेबांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूदीचे नियोजन करावे, अशी विनंती करतो.

यानंतर श्री. अजित.. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री.मुरली सिताराम देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री व श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

बॅ.अंतुले साहेबांनी आमच्या रायगड जिल्ह्यातून त्यांच्या राजकीय जीवनाची खरी सुरुवात केली. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. बॅ.अंतुले यांनी पकटीपासून त्यांच्या राजकारणाला खरी सुरुवात केली. आंबेतची पकटी ही त्यांच्या हृदयात आणि मनात इतकी रुजली होती की, शेवटच्या टप्प्यामध्ये त्यांना कोणतेही भाषण सुरु करायचे असेल तर ते आंबेतच्या पकटीने सुरु करीत होते. लोकांच्या देणगीतून ज्या पकटीसाठी त्यांनी सिमेंट गोळा केले होते, त्या सिमेंटची चोरी झाल्यामुळे ते तीन दिवस त्या सिमेंटवर झोपले होते. त्याच सिमेंटने त्यांना आयुष्याची 20 वर्षे मागे नेले. बॅ.अंतुले साहेब हे आमचे राजकीय विरोधक होते. आमच्या तीन पिढ्यांनी एकमेकांच्या संघर्षात्मक रुपाने अनेक राजकीय लढाया लढल्या होत्या. परंतु त्याच वेळी त्यांनी व्यक्तिगत संबंध कधीही तुटू दिले नाहीत. संघर्ष करताना या ठिकाणी अनेक निर्णय घेतले गेले, परंतु त्यांनी आमच्यासोबतचे व्यक्तिगत संबंध कधीही दूर केले नाहीत. आमच्या कुटुंबाचे आणि त्यांचे शेवटपर्यंत संबंध राहिले. कारण रायगड जिल्ह्यात माझे कुटुंब, माझे आजोबा, माझे वडील, माझे काका आणि आम्ही सातत्याने एका बाजूला सहकाऱ्यांबरोबर संघर्ष करीत होतो. त्यामध्ये अंतुले साहेब सुध्दा होते. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले ती गोष्ट खरी आहे. बॅ.अंतुले साहेब आणि त्यांची भेट 1968 साली झाली. परंतु माझी आणि अंतुले साहेबांची भेट 1960 मध्येच झाली. कारण त्या काळात माझ्या आजोबांना सर्व राजकीय पुढारी भेटायला येत असत. त्यावेळी आम्ही पोयनाडला राहत होतो. आमच्या जिल्ह्यात त्यावेळी दोनच साप्ताहिके होती. त्या काळात आमच्या वर्तमानपत्रांची चर्चा व्हायची. शेतकऱ्यांचे नेते म्हणून रायगड जिल्ह्यात माझ्या आजोबांबद्दल वेगळा आदर आणि दबदबा होता. अलिबागला जाताना ते सर्व पुढारी अगोदर आमच्या घरी भेटायला येत होते. मग ते काँग्रेस पक्षाचे असोत की विविध पक्षांचे असोत. त्यावेळी आम्ही आमच्या दिवाणखान्यातून चोरुन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्यांच्या चर्चा ऐकायचो. त्यावेळी मुस्लीम समाजातील एक तरुण बॅरिस्टर होतो आणि समाजासाठी झटतो, याबद्दल माझ्या आजोबांना वेगळे आकर्षण होते. आपल्या भावना त्यांनी कृषीवल्ल साप्ताहिकामध्ये अनेक वेळा लेखातून व्यक्त केल्या आहेत. ते आजही माझ्या संग्रही आहेत. अंतुले साहेबांबद्दल सांगावे तेवढे थोडेच आहे.

श्रीवर्धन मतदारसंघाचे त्यांनी नेतृत्व केले. श्रीवर्धन मतदारसंघ हा साडेतीन तालुक्यांचा होता. त्या ठिकाणी दळणवळणाच्या सोयी नव्हत्या. श्रीवर्धन ते बोगली आणि म्हसळा ते बोगलीपर्यंतचे अंतर लोक पायवाटेने चालत यायचे. त्या ठिकाणी कोणतीही गाडी जात नव्हती. नंतरच्या कालखंडात अंतुले साहेब सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी सर्वप्रथम श्रीवर्धन मतदारसंघाचे म्हणजेच साडेतीन तालुक्याचे चित्र बदलून टाकले आणि खऱ्या अर्थाने दळणवळणाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली. कारण रस्ता नसलेल्या गावामध्ये त्यांचा जन्म झाला होता. बॅ.अंतुले यांच्या गावाच्या पलीकडे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचे मंडणगड हे गाव आहे. त्यांनी मंडणगड येथे ब्रीज बांधला आहे. मंडणगड आणि आंबेत ही दोन्ही गावे जवळजवळ आहेत. त्या सर्व परिसरामध्ये बॅ.अंतुले साहेबांचा प्रभाव होता. महिन्यातून दोन वेळा मी अंतुले साहेबांना भेटायचो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यावेळी आमच्यामध्ये वेगवेगळ्या विषयांवर चर्चा व्हायच्या. गेल्या 2-3 महिन्यांपूर्वी देखील मी वेळ मिळेल तसा त्यांच्याकडे जायचो. त्यांची ठरलेली वेळ असायची. ते दुपारी 2 वाजता जेवायचे आणि दुपारी 4 ते दुपारी 6 पर्यंत त्यांना केव्हाही भेटू शकत होतो. ते रात्री 2 वाजेपर्यंत टी.व्ही. पाहत व वाचन करीत बसायचे. ते रात्री 2-3 वाजता झोपायचे. ते सकाळी मात्र उशिरा उठायचे. त्यामुळे त्यांना संध्याकाळीच भेटावे लागायचे. त्यांनी माझ्याशी चर्चा केली आणि काही अनुभव सांगितले. त्यांनी खूप गरिबी पाहिली आहे. त्यांना जेवताना कोकणी माणसाला लागते त्याप्रमाणे मच्छी हवी असायची. मच्छीचे समुद्रातील व खाडीतील असे दोन प्रकार आहेत. खाडीतील मच्छी खूप चविष्ट असते. मलाही खाडीतील मच्छी खूप आवडते. मला ते म्हणायचे की, मला काहीही आणू नकोस. पण खाडीतील मच्छी आणि जिताडा घेऊन ये. त्यांनी खूप गरिबी अनुभवलेली होती. गेल्या 2 वर्षांपूर्वी चर्चा करीत असताना ते म्हणाले की, जयंतराव, तुम्ही आज मच्छीबाबत बोललात. मी एवढी गरिबी पाहिली आहे की, माझी आई मला मच्छीच्या काट्याचा वरचा भाग एकदा द्यायची आणि खालचा भाग दुसऱ्या दिवशी सकाळी भाकरीबरोबर द्यायची आणि मी ते खायचो. मी एवढी गरिबी पाहिली आहे आणि म्हणून मला गरिबांबद्दल खरोखर कळवळा आहे.

सभापती महोदय, ते आंबेतवरून ओऊरला गेले. ओऊरच्या पदमदार हायस्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. त्यांचे शिक्षण लोकांनी वर्गणी काढून केले. मला आठवत नाही. पण सन्माननीय सदस्य श्री. सुनीलजी तटकरे त्याबाबत सांगू शकतील. श्रीवर्धनमध्ये त्यांना पाठविण्यासाठी प्रयत्न करणारी एक व्यक्ती अजूनपर्यंत आहे. मला त्या व्यक्तीचे नाव आठवत नाही. त्यांनी त्यांना बॅरिस्टर होण्यासाठी पैसे दिले होते. बॅ. अंतुले यांनी अंतुले पॅटर्न तयार केला. ते ताबडतोब निर्णय घ्यायचे. राज्यामध्ये जिल्ह्यांचे विभाजन झाले आणि औरंगाबाद, रत्नागिरी, लातूर म्हणजे त्यावेळचा उस्मानाबाद हे जिल्हे करण्यात आले. त्यांनी एका रात्रीमध्ये त्या संदर्भत निर्णय घेतला आणि दुसऱ्या दिवशी हेलिकॉप्टरने जाऊन एकाच वेळी सर्व जिल्ह्यांची उद्घाटने केली. निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला आहे आणि त्यांनी तो

श्री. जयंत प्र. पाटील ....

अधिकार दाखविला. ते प्रवाहाच्या विरूध्द गेले. अधिकारी कायदे सांगून अडवितात. परंतु, कायदे बदलण्यासाठी आपण आहोत. जनतेच्या हितासाठी कायदे बदलण्याची क्षमता या सभागृहात आहे आणि मुख्यमंत्री म्हणून मी ते करून दाखविले असेही त्यांचे म्हणणे होते.

सभापती महोदय, बॅ. अंतुले 18 महिने मुख्यमंत्री राहिले. सिमेंटसाठी त्यांची आयुष्यातील 20 वर्षे वाया गेली होती. त्यांनी त्या संदर्भात सांगितले की, मी टेबलाखालून पैसे घेतले नाहीत तर टेबलावरून घेतले. ते मी घेतले असे शेवटपर्यंत सांगणारे पहिले लोकप्रतिनिधी ते होते. त्यांच्या आयुष्यातील 20 वर्षे यामध्ये गेली. कारण 20 वर्षे त्यांना कोर्टामध्ये या संदर्भात झगडावे लागले. त्यांनी जेवढे पैसे गोळा केले होते, तेवढे पैसे त्यांच्या अकाऊंटमध्ये इंदिरा प्रतिष्ठानमध्ये होते आणि हे सिध्द करण्यासाठी त्यांच्या आयुष्यातील 20 वर्षे गेली. 20 वर्षानंतर ते त्या आरोपातून सुटले. मग त्यांच्या राजकीय कारकिर्दीची पुन्हा सुरूवात झाली. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांनी या ठिकाणी एक उल्लेख केला. मी त्याचा साक्षीदार आहे. मंत्रालयाच्या सभागृहामध्ये जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची कॉन्फरन्स भरली. मी त्यावेळी पंचायत समिती सदस्य होतो. वडिलांबरोबर मी त्या ठिकाणी गेलो होतो. माझ्या वडिलांनी त्यांना मागणी केली की, ज्या कुलाब्यातून तुम्ही आला आहात, ज्या छत्रपतींचे नाव तुम्ही सतत घेत आहात, त्या कुलाब्याला तुम्ही रायगड नाव देणार का ? ते म्हणाले की, प्रभाकर पाटील, तुम्ही सांगितले आणि मी नाव देऊन टाकले. माझे वडील कसे होते हे तुम्हाला माहीत आहे. त्यांनी विचारले की, तुम्ही नाव कधी देणार ? त्यावेळी बॅ. अंतुले म्हणाले की, आता दिले. त्यांनी ताबडतोब सीएसला बोलावून ड्राफ्ट तयार केला आणि वडिलांना ऑर्डर दिली आणि म्हणाले की, उद्यापासून तुम्ही रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आहात. मी त्याचा साक्षीदार आहे. ते अतिशय ताबडतोब निर्णय घेत. त्यांचा निर्णय घेण्याचा वेगळा खाक्या होता, जो खास अंतुले पॅटर्न म्हणून प्रसिध्द होता. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या समवेतही त्यांचे मैत्रीचे संबंध होते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.........

त्यांची खुली मैत्री होती आणि दोघेही मोकळ्या मनाचे होते. दोन्ही पक्षात संघर्ष सुरु होता. परंतु बॅरिस्टर साहेबांनी सांगितले की, मी शिवसेनेचा दिल्लीतील ॲम्बेसॅडर म्हणून काम करतो आहे. शिवसेना आणि काँग्रेस पक्षात संघर्ष असताना दिल्लीमध्ये त्यांनी हे सांगितले होते. मोकळेपणाने आणि कशाचीही पर्वा न करता बोलणारा नेता या महाराष्ट्राला पुन्हा लाभेल, असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, अनेक निवडणुका आम्ही अंतुले साहेबांच्या विरोधात लढलो. निवडणुकात कधी ते पराभूत झाले, कधी आम्ही पराभूत झालो. माझे घर पेजारीला आहे. अलिबागला जाण्यासाठी एकच रस्ता असल्यामुळे आणि त्यावेळी रोह्याचा रस्ता देखील नसल्यामुळे अलिबागला आमच्या घरावरुनच जावे लागत असे. मतमोजणीच्या दिवशी ते पराभूत झाले तरी आमच्या घरावरुन जायचे आणि घरी यायचे. ते असे म्हणायचे की, निवडणुक झाली, मतभेद संपले, प्रभाकर पाटील आता आपण काम करु. विजयी झाले तरी त्यांची हीच पध्दत असायची. निवडणुकीची धामधुम असायची. रायगडमध्ये मोठा संघर्ष असायचा. तरी ते कशाला बधले नाहीत. पाच मिनिटे थांबणार, नमस्कार करणार आणि पुढे निघून जाणार. ही जी त्यांची काम करण्याची वेगळी हातोटी आणि पध्दत होती, ती महाराष्ट्र कधीही विसरु शकणार नाही. सभापती महोदय, त्यांनी तीन-चार पुस्तके लिहिली. त्यामध्ये महाजन आयोगाची चिरफाड करणारे जे पुस्तक लिहिले आहे ते महाराष्ट्र कधीही विसरु शकणार नाही. सीमावासी तर कधीही हे पुस्तक विसरणार नाहीत. आज बेळगाव, कारवार, निपाणीसाठी आपण सर्वोच्च न्यायालयात केस लढतो आहोत. महाजन अहवालाची चिरफाड करणारे जे पुस्तक अंतुले साहेबांनी लिहिले आहे, त्यामधून आज देखील आपल्याला संदर्भासाठी उतारे घ्यावे लागतात, हेच त्यांचे मोठेपण आहे.

सभापती महोदय, अंतुले साहेबांना आम्ही जवळून बघितले. पण त्यांचे खरे साथीदार एकच होते. या राज्याचे माजी राज्यमंत्री श्री.रवींद्र राऊत. श्री.रवींद्र राऊत आणखी 20-25 वर्षे हयात असते तर बॅ.अंतुले यांचे पुढचे राजकीय चित्र संपूर्णपणे बदलले असते. रायगडचे राजकारण सुध्दा बदलले असते. ते गेले त्याबद्दल त्यांना भरपूर दु:ख होते. ते त्यांना रवी म्हणून संबोधायचे. "रवी असता तर माझे वेगळे राजकारण दिसले असते", असे ते सांगत असत.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, या राज्यातील सहकार चळवळ ही अंतुले साहेबांमुळे जीवंत आहे. सन 1980 मध्ये कर्ज माफीचा निर्णय घेणारा पहिला मुख्यमंत्री म्हणून त्यांना भारतात मान आहे. रिझर्व्ह बँकेने त्यांना विरोध केला होता. परंतु त्यांनी त्याची पर्वा केली नाही. माझी खुर्ची गेली तरी चालेल परंतु शेतकऱ्यांसाठी कर्ज माफीची अंमलबजावणी मी 100 टक्के करणार आहे, कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही, अशी त्यांची भूमिका होती. आज सहकार चळवळ त्यामुळेच जीवंत आहे. त्यावेळी त्यांनी कर्ज माफी केली नसती तर आजची परिस्थिती आपल्याला वेगळी दिसली असती. सन 1989 मध्ये सन्माननीय श्री. मधू दंडवते यांनी देखील कर्ज माफी केली होती. परंतु देशात कर्ज माफीचा धाडसी निर्णय अंतुले साहेबांनी प्रथमतः घेतला. त्या अर्थानेही अंतुले साहेब एक वेगळे, धडाकेबाज व्यक्तिमत्त्व होऊन गेले.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधींना वेगळा मान आणि सन्मान देण्याचे काम खऱ्या अर्थाने त्यांनी केले. लोकप्रतिनिधी निवृत्त झाल्यानंतर त्यांना सन्मानपूर्वक मुंबईत राहण्यासाठी जागा असली पाहिजे यासाठी विरोध असतानाही त्यांनी वरळीमध्ये आमदारांची पहिली सोसायटी स्थापन केली. त्याचे सर्व श्रेय अंतुले साहेबांना आहे. आजही लोकप्रतिनिधींना मानसन्मान मिळाला पाहिजे, असे मला वाटते आणि तीच अंतुले साहेबांना खरी श्रध्दांजली ठरेल. सरकारी अधिकाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींना मिळणारी वागणूक सन्मानाचीच असली पाहिजे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.मा.शिगम...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:55

श्री. जयंत प्र. पाटील...

माजी केंद्रीय मंत्री व माजी विधानपरिषद सदस्य स्वर्गीय मुरली देवरा यांचा आणि माझा फार कमी संबंध आला. मी माझ्या वडिलांबरोबर आणि काकांबरोबर अनेक वेळा त्यांना भेटलो. मुरली देवरा हे बॅ. रजनी पटेल यांचे खरे सहकारी होते. बॅ. रजनी पटेल हे कम्युनिष्ट पक्षाचे होते. 1977मध्ये गरिबी हटावच्या वातावरणामध्ये ते काँग्रेस पक्षामध्ये गेले. त्यांनी मुंबईमध्ये जे जे तरुण नेतृत्व निर्माण केले त्यापैकी मुरली देवरा हे एक होते. 1977 मध्ये ते शिवसेनेच्या पाठिंब्यावर मुंबईचे महापौर झाले. त्यानंतर ते सातत्याने 5 वेळा खासदार झाले. एक चांगले प्रशासक अशी त्यांची ओळख होती. मुंबई शहरामध्ये सर्व स्तरात त्यांनी काम करुन एक वेगळी प्रतिमा निर्माण केली होती.

बॅ. अंतुले, श्री.मुरली देवरा आणि श्री.भास्करराव शिंदे या तिघांनाही मी माझ्या पक्षाच्या आणि माझ्या कुटुंबीयांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ): सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

छत्रपती शिवरायांना जसा रयतेचा कळवळा होता तसा कळवळा बॅ. अंतुले साहेबांनी ते मुख्यमंत्री असताना आणि त्यानंतर सुध्दा दाखवला हे त्याचे वैशिष्टय होते. बॅ. अंतुले साहेबांचा मुख्यमंत्री पदाचा काळ फक्त 18 महिन्यांचा होता. या 18 महिन्याच्या कालावधीमध्ये 18 वर्षे मुख्यमंत्री पदी काम करावे अशा प्रकारचे महत्वाचे निर्णय त्यांनी घेतले. त्यांनी आमदारांना मिळवून दिलेली प्रतिष्ठा हा त्यांनी घेतलेल्या निर्णयातील एक महत्वाचा निर्णय होता. विधिमंडळातील सदस्यांना अधिकाऱ्यांपेक्षा अधिक अधिकार आहेत, ते राज्याचे प्रतिनिधी आहेत हे प्रस्थापित करण्याचे काम, लोकशाही बळकट करण्याचे काम बॅ. अंतुले साहेबांनी केले. माझ्या राज्यातील कोणीही वृद्ध माणूस निराधार राहू नये, त्यांना सन्मानाने जगता यावे अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यांनी राज्यात संजय गांधी निराधार योजना राबविली. त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. मग ते बेळगाव-कारवार सीमाबांधवाशी निगडित असतील किंवा अन्य राजकीय निर्णय असतील. त्यांनी जे धडाडीचे निर्णय घेतले त्याला तोड नाही. लंडनला जाऊन शिवरायांची भवानी तलावार आणण्याची हिंमत त्यांनी दाखविली. शिवरायांनी जी भवानी तलवार वापरली ती या राज्यात असली पाहिजे अशा प्रकारचा आग्रह त्यांनी धरला. बॅ. अंतुले साहेबांनी मराठी भाषेला आणि संस्कृतीला ज्या पध्दतीने पुढे नेले तसे काम त्यांच्या आधी वा नंतर झालेले नाही. बॅ. अंतुले साहेबांनी सागरी महामार्गाचा पण केला होता. तो पण त्यांच्या काळात त्यांना पूर्ण करता आला नाही. सतत दुर्लक्षित असलेली कोकणपट्टी ही बॅ. अंतुले साहेबांच्या काळात पुढे आली. सागरी महामार्गाला बॅ. अंतुले साहेबांचे नाव देऊन उचित स्मारक करावे अशी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, स.का.पाटील, बॅ. रजनी पटेल यांच्यानंतर मुंबईवर राज्य करण्याचे काम कोणी केले असेल तर ते मुरली देवरा यांनी केले. मुरली देवरा हे सुविद्य होते. ते अत्यंत आग्रही आणि निकराने कारभार करणारे होते. मुरली देवरा यांची आठवण मुंबइतील जनमानसाला आणि लोकप्रतिनिधींना सतत होत राहील.

स्व. भास्करराव शिंदे यांनी केलेले काम अविस्मरणीय आहे. या तिन्ही नेत्यांच्या संबंधी जो शोक प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडला त्याबद्दल मी माझ्या सहवेदना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

..3..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, बॅ. अंतुले साहेब आणि मुरली देवरा हे दोन्ही नेते गांधी कुटुंबाशी एकनिष्ठ होते. नेहमी प्रतिकूल परिस्थितीत गांधी कुटुंबाशी निष्ठा दाखविणारी ही दोन व्यक्तिमत्वे होती.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:00

श्री.दिवाकर रावते....

त्यांनाच आपण आज आदरांजली वाहतो आहोत. या सदनामध्ये येत असताना आपण एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असतो. आपल्या राजकीय पक्षाच्या एका अत्युच्च व्यक्तिमत्वाला आदरांजली वाहत असतो, तशी ती असावी असे मला वाटते. परंतु तसे जाणवले नाही म्हणून मी उल्लेख केला. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी बॅ.अंतुले यांना आदरांजली वाहताना तडफदार नेतृत्वाला साजेशी अशी तडफदार आदरांजली वाहिली. बॅ.अंतुले हे गांधी कुटुंबीयांशी निष्ठावान होते. सर्वात महत्वाचे म्हणजे देशामध्ये कोणालाही जमले नाही असा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा महत्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. आज महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आहेत याबद्दल सभागृहामध्ये सर्वांचेच एकमत आहे. परंतु एका मोठ्या नेतृत्वाला आदरांजली वाहण्याचा योग आलेला असताना महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्याची सभागृहाची मानसिकता असताना आदरांजली वाहण्याचा प्रस्ताव थांबवावा असे म्हटले असते तर बॅ.अंतुले यांचा फार मोठा सन्मान झाला असता. परंतु आपल्याला सांगावे लागले. मी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी जाणीव करुन दिली.

कोकणातील आणि महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाच्या एका मोठया नेतृत्वाला, माजी मुख्यमंत्र्यांना आदरांजली वाहायची आहे, त्यांच्या कार्याची उंची दाखवावी ही जाणीव करुन द्यावी लागली. म्हणून मला भावना व्यक्त करावी लागली. ज्यांच्या संदर्भात आपण आदर व्यक्त करीत असतो त्यांचा सन्मान राहिला पाहिजे.

सभापती महोदय, शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी बॅ.अंतुले हे दिनांक 16 नोव्हेंबर, 2012 रोजी मातोश्री बंगल्यावर आले होते त्यावेळी मी त्यांच्यासोबत तेथे बसलो होतो. त्यांच्याशी झालेली भेट या निमित्ताने मला आठवते. शालेय जीवनात शाळेमध्ये जात असताना जेट्टी नाही त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होते याची जाणीव ठेवून स्वत: सिमेंट गोळा करुन रात्रभर थांबून जेट्टीचे काम करुन घेणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. हे करा, ते करा असे आपण आदेश देतो. परंतु सिमेंटला आपण हात लावत नाही. त्यांनी सिमेंट गोळा करुन तसेच वर्गणी काढून गावातील जेट्टीचे काम पूर्ण केले व गावातील विद्यार्थ्यांची सोय केली. सिमेंट घोटाळ्याच्या प्रकरणामध्ये त्यांना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला हा दुर्दैवी योग आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, बंडखोरी ही त्यांच्या रक्तात होती. तडफदार, दमदार असे ते नेतृत्व होते. बंडखोरीला विधायक माध्यमातून नियमित करण्याचे सामर्थ्य त्यांनी दाखविले. प्रत्येक वेळेला भांडलेच पाहिजे असे नाही. इंग्लंड येथे ते गेले होते त्यावेळी महात्मा गांधींची बदनामी झालेली पाहून त्यांनी आंदोलन केले होते. संसदेच्या सदस्यांना विशेषाधिकार मिळाला पाहिजे याकरिता त्यांनी पुस्तक लिहिले. ज्यावेळेला सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या नेमणुकीच्या संदर्भात देशामध्ये वाद निर्माण झाला होता त्यावेळी बॅ.अंतुले यांनी Appointment of A Chief Justice नावाचे पुस्तक लिहिले आणि आपल्या नेतृत्वाची कायदेशीर घटनात्मक पाठराखण करण्यामध्ये त्यांची मोठी बंडखोरी होती.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

सर्वात मोठी बंडखोरी झाली आणि जी प्रत्येकाने आपल्या मनाशी अभिमनाने बाळगावी ती म्हणजे बॅ. अंतुले साहेबांनी "महाजन रिपोर्ट अनकव्हर्ड" नावाचे पुस्तक लिहून केली होती. बेळगांव सीमा प्रश्नाच्या वेळेस शिवसेनेच्या वतीने जे आंदोलन झाले होते तेव्हा हा महाजन अहवाल बाहेर काढला आणि त्याचा परिणाम आजही सीमा प्रश्न जिवंत असून सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण आहे. बॅ. अंतुले साहेबांनी महाजन अहवालाच्या संदर्भात अशा प्रकारे लिहील्याचे आजही कोणीच नाकारु शकणार नाही. त्या माध्यमातून त्यांनी सीमा भागातील जनतेवर कशा प्रकारे अन्याय होत आहे हे त्यांनी दाखवून दिले होते व ते संपूर्ण महाराष्ट्र कधीच विसरणार नाही. आज सुध्दा एकही अधिवेशन सीमा प्रश्नाच्या विषयाचा उल्लेख केल्याशिवाय मा. राज्यपालांनाही पुढे जाता येत नाही ही संपूर्ण परिस्थिती निर्माण होण्यास तोच महाजन अहवाल करणीभूत आहे. त्याचप्रमाणे अंतुले साहेब धडाडीने निर्णय घेत होते व ते अंमलातही आणण्याची धमक त्यांच्यात होती. कुलाबा जिल्ह्याचे नामकरण तसेच संपूर्ण राज्यातील सर्व पंचायत समित्यांचे तालुक्यांमध्ये रुपांतर करणे असे महत्वाचे निर्णय घेऊन त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणी त्यांच्याच काळात झाली आहे.

महोदय, हुतात्मा स्मारकांची निर्मिती प्रत्येक जिल्हा व तालुक्यात करण्याचा निर्णय देखील बॅ. अंतुले साहेबांच्याच काळात झाला पण आज मात्र दुर्दैवाने त्यांची देखभाल नीटपणे होत नाही. सभागृहात बॅ. अंतुले साहेबांच्या स्मारकाची मागणी करण्यात आली आहे, ते ठीक आहे पण त्यांनी या देशाकरिता हौतात्म्य पत्करणाऱ्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला व त्यातून येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळेल असे काही निर्माण करु शकलो तर ती खरीखुरी अंतुले साहेबांना श्रध्दांजली ठरेल. निष्ठा कशी असते याचे एक उदाहरण मी देणार आहे. या देशात गांधी घराण्याच्या नावाने जवळपास 800 योजना आहेत. परंतु मला गरिबांची जाणीव आहे हे सांगत असताना माझ्या नेत्याचे नाव असले पाहिजे म्हणून इंदिरा गांधी पेन्शन योजना निर्माण करण्यात आली. संजय गांधी हे त्यावेळेस वादग्रस्त व्यक्तिमत्व होते परंतु बॅ. अंतुले साहेबांनी आग्रह धरला व त्यांच्या नावाने संजय गांधी निराधार योजना सुरु झाली. त्याचे उतराई म्हणून बॅ. अंतुले साहेबांना मुख्यमंत्री पद देखील मिळाले होते. कोकण प्रदेशात "साकव" हा विषय महत्वाचा असून आता त्यांचे पक्क्या साकवांमध्ये रुपांतर झाल्याचे दिसते. अशा प्रकारे त्या त्या काळात

....2

श्री. दिवाकर रावते....

परिस्थितीनुरुप अंतुले साहेबांनी काम केले आहे. अंतुले साहेबांच्या बाबतीत नेहमी सांगितले जात होते की, अल्पसंख्याक समाजाचे एकमेव मुख्यमंत्री हे कोकणातील होते. त्यानंतरच्या काळात मात्र मा. शिवसेना प्रमुखांच्या आग्रहाने कोकणाला दोन मुख्यमंत्री मिळाले...

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

श्री.अंतुले हे अल्पसंख्याक आहे असे कोणाला कधीच वाटले नाही. आम्हाला देखील कधी वाटले नाही. आपण सर्वसामान्यांचे आहोत असा त्यांनी ठसा उमटविला होता. बॅ.अब्दुल रेहमान अंतुले हे नाव उच्चारले तरी ते अल्पसंख्याक समाजाचे आहे असे वाटत नव्हते. एवढी एकरूपता त्यांनी सर्व समाजातील लोकांमध्ये निर्माण केली होती. ते महाराष्ट्राचे पहिले अल्पसंख्याक मुख्यमंत्री असले तरी त्यांना अल्पसंख्याक कोणीही मानत नव्हते. सहकार क्षेत्रातील सामर्थ्य ज्याच्याकडे आहे तोच मंत्री पदावर येतो, मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचतो. सहकार क्षेत्रातील कुठलेही सामर्थ्य नसताना केवळ इंदिरा गांधी घराण्याशी निष्ठा यामुळेच बॅ.अंतुले यांना मुख्यमंत्री पद मिळाले. निष्ठेला फार महत्त्व असते. आपल्याला जरा काही मिळाले नाही की, निष्ठा बदलली जाते. इंदिरा गांधी ज्यावेळी अडचणीत होत्या त्यावेळची घटना मला आठवते. आणीबाणीनंतर त्या पराभूत झाल्या होत्या. त्या एकदा परभणी येथे आल्या होत्या. त्यावेळच्या काँग्रेसवाल्यांनी त्यांना रेस्ट हाऊसमधील पाणी देखील प्यायला दिले नाही. मी येथे कोणाचेही नाव घेऊ इच्छित नाही. ते सगळे मला आठवते आहे. त्यांना रेस्ट हाऊसच्या कक्षात देखील घेण्यात आले नाही. त्यांना बाहेर ठेवण्यात आले. हा इतिहास आहे. ते आज काँग्रेसमध्ये मानाने आहेत. पण बॅ.अंतुले यांची निष्ठा दुर्दम्य होती. निष्ठेला कधीही पराभूत करता येत नाही. जो नेता आपल्याला पक्षामध्ये मोठा करतो तो कधीही राजकीय जीवनामध्ये पराभूत होऊ देत नाही. श्री.वसंतदादा पाटील यांचा इतिहास आपल्याला माहीत आहे. आपण त्याचे साक्षीदार आहात. श्री.वसंतदादा पाटील यांना बाजूला सारून श्री.शरद पवार यांनी पुलोदचे सरकार स्थापन केले. पण एक निष्ठा व्यक्त न होणारे सरकार घालवण्याचे काम माननीय श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले तेव्हा पहिला निष्ठावान मुख्यमंत्री होण्याचा मान श्रीमती इंदिरा गांधी यांनी बॅ.अंतुले यांना दिला. त्यांचे मुख्यमंत्रीपद हे अल्पसंख्याकाचे नव्हते. निष्ठा व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान हा पक्षामध्ये केला जातो. त्याचे उदाहरण म्हणजे श्री.अंतुले यांचे मुख्यमंत्री पद होय. सिमेंटचा विषय सर्वांनी सांगितला. त्यामुळे त्यांना दुर्दैवाने 20 वर्षे राजकीय वनवास भोगावा लागला. नंतर ते त्यातून मुक्त झाले. कधी कधी भावनांचा विषय असतो. मी टेबलाखालून घेतले नाही तर टेबलावरून घेतले हे सांगण्याची हिंमत श्री.अंतुले यांनी दाखविली. तेव्हा त्यांना श्रद्धांजली वाहणाऱ्यांमध्ये देखील नैतिकता असली पाहिजे असे मला वाटते. ...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी भवानी तलवारीचा उल्लेख केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याप्रती त्यांच्या मनामध्ये दुर्दम्य निष्ठा होती. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी पूर्वीच्या कुलाबा या जिल्ह्यातील रायगडावर होती. त्यामुळे त्यांनी त्या जिल्ह्याचे नाव रायगड केले. बॅ.अंतुले यांचे मोठेपण कशामध्ये आहे ? अफझलखानाचा कोथळा छत्रपती शिवाजी महाराजांनी काढला हे आपण स्वीकारावे. तरी पण समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना त्याचा राग का येतो, आपण अफझलखानाचे कोणीही लागत नाही. आपण या भूमीचे भूमिपुत्र आहोत. आपला जन्म येथे झालेला आहे. ही आपली माती आहे. ही छत्रपतींची माती आहे. त्यामुळे छत्रपतींचा अभिमान बाळगणाऱ्यांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढल्याचे कधीही दुर्दैवाने वाईट वाटून घेऊ नये, हे सांगणारे बॅ.अंतुले यांचे कर्तृत्त्व आहे.

बॅ.अंतुले हे माननीय शिवसेनाप्रमुखांच्या अत्यंत जवळचे होते. त्यांचे नाते खूप जवळचे होते. असे भाग्य काँग्रेससह अन्य पक्षाच्या कुठल्याही मुख्यमंत्र्यांकडे असावे. आमचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस आहेत. त्यांना देखील सांगतो की, ज्यावेळी देशातील ?महाराष्ट्रातील सर्वोच्च नेतृत्त्व असे वक्तव्य करतात तेव्हा त्याचा मागोवा घेतांना माननीय शिवसेनाप्रमुखांना विचारले की, आपला मुख्यमंत्री कसा असावा ?

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .. ..

कर्तृत्व कसे असावे तर ते अंतुले साहेबांसारखे् असावे. एवढा मोठा सन्मान मिळवणारे माननीय अंतुले साहेब हे एकटेच नेते आहेत. माननीय अंतुले साहेबांच्या कर्तृत्वाचा ठसा विरोधकांनी सुध्दा स्वीकारला होता.

या ठिकणी सन्माननीय सदस्य श्री. सनील तटकरे साहेबांनी सागरी महामार्गाला माननीय अंतुलेसाहेबांचे नाव दिले जावे अशी सूचना केली आहे. सागरी महामार्ग अद्यापपर्यंत कागदावरच आहे. माननीय तटकरे साहेबांनी केलेली सूचना चांगली आहे. सागरी महामार्ग कोकणाच्या सागरी किनाऱ्यावरुनच जाणारा आहे. परंतु या भावनाचा आदर आपण केला होता काय ? सनमाननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी तर सागरी महामार्गाला माननीय अंतुले साहेबांचे नाव देऊन टाकावे अशी सूचना केली. परंतु हा सागरी महामार्ग अजून कागदावरच आहे याची त्यांना कल्पना नसावी. ज्यावेळेला मुंबईचा सि-लिंक तयार झाल्यानंतर त्या सि-लिंकला सावरकरांचे नाव दिले जावे यासंदर्भात शिवशाही सरकारने निर्णय घेतला होता परंतु मध्यंतरीच्या काळात आमचे सरकार बदलून आघाडी सरकार आले. त्यावेळी सि-लिंकला आमच्या मर्जीनुसार नाव देऊ असा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार सि-लिंकचे नाव बदलण्यात आले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तयार झाला होता त्यावेळी या मार्गाला पु.ल.देशपांडे यांचे नाव दिले जावे अशी आम्ही सूचना केली होती परंतु आमच्या सूचनेप्रमाणे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पु.ल.देशपांडे यांचे नाव दिले गेले नाही. आम्ही राजकीय नाव सुचवले असते आणि ते तुम्ही बदलले असते तर ते एकवेळेस आम्ही मान्यही केले असते. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला स्व.यशवंतराव चव्हाणांचे नाव हट्टाने दिले गेले. विरोधक जी सूचना करतात ती ऐकायची नाही यासंदर्भात आपण जेव्हा मानसिकता तयार करतो त्यावेळी दैदीप्यमान नेत्याला आदरांजली वाहत असताना त्यांचे मोठेपण सांगून, त्यांचे भव्यपण निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळेला तो विचार खरोखर आपल्या मनात असतो काय याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे.

सागरी मार्गाला माननीय अंतुले साहेबांचे नाव द्यावे अशी जी सूचना आहे ती चांगली आहे. परंतु या सागरी महामार्गाला 15 ते 20 वर्ष लागणार असून त्या कालावधीपर्यंत युती शासन सत्तेवर राहणार असून आपल्याला हे काम करायचे आहे.

श्री. दिवाकर रावते .. ..

माननीय अंतुले साहेब हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जवळचे मित्र होते. माननीय अंतुले साहेबांना माझ्या वतीने तसेच माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

माननीय मुरली देवरा हे मुंबईचे आगळे-वेगळे व्यक्तिमत्व होते. माननीय मुरली देवरा यांना हलविणे ही काही साधी गोष्ट नव्हती. स.का.पाटील यांना मी माझ्या शालेय जीवनापासून अनुभवले होते, पाहिले होते. स.का.पाटील आणि संयुक्त महाराष्ट्राची लढाई हे एकच आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये 106 हुतात्मे झाले असले तरी त्यामध्ये जे हुतात्मे झाले त्या हुतात्म्यांचे सामर्थ्य स.का.पाटील यांच्या वक्तृत्वामध्ये सामावले होते. मुंबईतील काँग्रेसची संपूर्ण ताकद माननीय मुरली देवरा यांच्याकडे होती. शिवसेनेच्या ताब्यात मुंबई महानगरपालिका येईपर्यंत महापालिकेत माननीय मुरली देवरा यांनी सामर्थ्य टिकवून ठेवले होते. माननीय मुरली देवरा प्रथम नगरसेवक झाले, महापौर झाले होते. मला आठवते की, सोहनसिंग कोहली यांनी शिवसेनेशी वाद निर्माण केला होता. सोहनसिंग कोहली हे एक आदर्श नगरसेवक होते. ते सायन कोळीवाडा येथून निवडून येत असत. विधानसभेत आता ज्याप्रमाणे माननीय गणपतराव देशमुख आहेत त्याच प्रमाणे सोहनसिंग कोहली होते. एकदा वाद घालायला लागले की, ते कधीही थांबत नसत. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांनी माननीय मुरली देवरा यांना उघडपणे निवडून आणले होते. शिवसेनेच्या मतातून त्यांना महापौरपद मिळालेले आदरणीय मुरली देवरा साहेब हे शेवटपर्यंत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वेळोवेळी माननीय बाळासाहेबांना भेटत असत. त्यांना ज्या ज्यावेळी पद मिळत होते त्या त्यावेळी ते आदरणीय शिवसेना प्रमुखांचे आशीर्वाद धेत असत. माननीय मुरली देवरा यांनी शिवसेनाप्रमुखांची कृतज्ञता कायम जोपासली होती. राजकारणामध्ये आपण कोणत्या पक्षाचे आहोत यापेक्षा कृतज्ञता जोपासणे फार महत्वाचे असते. कै.मुरली देवरा यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना आदरांजली वाहत असताना कै.भास्करराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

यानंतर श्री. अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काही राजकीय व्यक्तिमत्व ही राज्याला नव्हे तर देशाला दीपस्तंभासारखी असतात. अशी राजकीय व्यक्तिमत्व राजकारणामध्ये आणि प्रशासनामध्ये एक वेगळा ठसा उमटवून जातात. त्यामध्ये बॅ.अे.आर.अंतुले यांचे नाव खऱ्या अर्थाने फार वरच्या क्रमांकावर येते असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात सांगितले की, एवढ्या मोठ्या नेत्याचा शोक प्रस्ताव आणि मध्येच वेगळा विषय निघाला, असे घडता कामा नये होते. ते म्हणाले ते बरोबर आहे, त्यामध्ये काही चूक नाही. परंतु मला एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते की, आज सभागृहासमोर जे कामकाज आहे त्यामध्ये "वंदे मातरम्" झाल्यानंतर पहिल्या क्रमांकावर "मंत्र्यांचा परिचय", दुसऱ्या क्रमांकावर "सभापती-तालिका नामनिर्देशन" आणि तिसऱ्या क्रमांकावर शोक प्रस्ताव असा क्रम आहे. आपण या ठिकाणी ज्यांच्या शोक प्रस्तावावर आपल्या भावना व्यक्त करणार आहोत ती असाधारण अशी व्यक्तिमत्वे आहेत. परंतु त्याच बरोबर राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु आहे आणि त्याचा उल्लेख येथे केला तर ते चुकीचे आहे, असे मला वाटत नाही.

सभापती महोदय,समोरच्या बाकावर किती मंत्री उपस्थित आहेत हा देखील संशोधनाचा विषय होऊ शकेल असे मला वाटते. कै.बॅ.अे.आर.अंतुले यांच्याबद्दल येथे भरपूर बोलले जात आहे. आपण एखाद्या नेतृत्वाबद्‌दल बोलत असताना, त्यांच्याबद्दल खऱ्या भावना व्यक्त करीत असताना आपल्या मनाचा मोठेपणा दाखविणे आवश्यक आहे आणि तो सर्वांमध्ये असावा असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी कै.बॅ.अे.आर.अंतुले यांना ज्या पद्धतीने आदरांजली वाहिली ती पाहता तशी ती काळाची गरज होती असे मला वाटते. या ठिकाणी अनेक सदस्य असे असतील की ज्यांना बॅ.अे.आर.अंतुले यांच्याबद्‌ल माहिती नसेल, जे अधिकारी अदृश्य स्वरुपात येथे बसलेले आहेत त्यांना देखील बॅ.अंतुले यांच्याबद्दल माहिती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.. ..

नसेल. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी अत्यंत थोड्या वेळात बॅ.अंतुले यांचा जीवनपट आपल्यासमोर ठेवून त्यांच्या कार्याची आपल्या सर्वांना माहिती दिली. त्यांनी या ठिकाणी जी माहिती दिली ती आपल्या सर्वांच्या ज्ञानामध्ये भर टाकणारी आहे. या माहितीमुळे समाजामध्ये राजकारणाविषयी जी घृणा निर्माण होत आहे ती कुठेतरी दूर होण्यास मदत होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, कै.बॅ.ए.आर.अंतुले यांच्याबद्दल माझ्या सहकाऱ्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. एखादा नेता समाजातील बदलणाऱ्या घटनांबद्दल कसा सूक्ष्मपणे अभ्यास करु शकतो, समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे काम कसे करु शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे बॅ.ए.आर.अंतुले आहेत, असे मी म्हटले तर ते वावगे होणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

महोदय, या ठिकाणी अनेक सहकाऱ्यांनी उल्लेख करताना सांगितले की, त्या कालखंडात श्रीवर्धन मतदारसंघ हा तीन-साडेतीन तालुक्यांचा होता. तो भाग अतिशय दुर्गम होता. सकाळी एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात जाण्यासाठी निघालो तर तेथे पोहचण्यासाठी संध्याकाळ होत असे. कारण त्या भागात मध्ये खाडी आणि डोंगर-दऱ्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, अंतुले साहेबांच्या गावाजवळ माझे म्हापराण-मंडणगड हे गाव आहे. त्या कालखंडात मंडणगड येथे जायचे असेल तर अर्धा दिवस लागत होता. त्या ठिकाणी सावित्री नदीवरील आंबेत-म्हाप्रळ पूल असेल, साळावचा पूल असेल, किंबहुना, सर्व दळणवळणाची कनेक्टीव्हीटी असेल, ती केवळ आणि केवळ अंतुले साहेबांनी केली हे खात्रीपूर्वक आणि ठामपणे सांगावेसे वाटते.

महोदय, कोकणची एक विशिष्ट संस्कृती आहे. तसेच कोकणचे प्रश्न सुध्दा विशिष्ट आहेत. मुख्यमंत्री पदावर असताना, अख्ख्या राज्याचा गाढा हाकत असताना मग ते जिल्ह्यांचे विभाजन असेल, गाव तेथे रस्ता ही संकल्पना असेल ती अंतुले साहेबांनी राबविली. केवळ घोषणा न करता ती संकल्पना राबविण्याचा पूर्ण प्रयत्न अंतुले साहेबांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या 18 महिन्यांच्या कालावधीत केला. आपण सर्व त्याचे साक्षीदार आहोत. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, साकव हा शब्द कोकणातील आहे. तसेच पकटी हा शब्द सुध्दा कोकणातील आहे. पकटी हा शब्द इतर भागातील लोकांना समजणार नाही. आजच्या युगात पकटी म्हणजे जेट्टी होय. अंतुले साहेबांचा मतदारसंघ व परिसर दुर्गम असल्यामुळे त्या भागात दळणवळणाची कोणतीही साधने नव्हती. त्या भागातील खाडीमध्ये छोटीछोटी बंदरे होती. आम्ही त्या वेळी महत्प्रयासाने गावच्या ठिकाणी रात्री पोहचायचो हे सांगत असताना मनाला वेदना होतात. या सर्व परिस्थितीची जाण आमच्या नेतृत्वाला होती. कोकणात पाणतून हा प्रकार असतो. हा प्रकार सुध्दा आमच्या नेत्यानी खाडीत आणला आणि त्यामुळे आम्हा कोकणवासीयांना एकप्रकारचे वरदान मिळाले.

महोदय, कोकणात बेदखल कुळांचा प्रश्न हा खऱ्या अर्थाने बॅ.अंतुले साहेबांनी ऐरणीवर आणला होता. पिढ्यानपिढ्या एका घरात राहत असलेल्या कुटुंबाची त्याच्या घराखालची जमीन त्याच्या मालकीची नव्हती. असा प्रकार महाराष्ट्रातील इतर कोणत्याही भागात नव्हता. त्या

..2..

श्री.भाई जगताप....

बेदखल कुळांच्या प्रश्नाला प्राधान्य देण्याचे किंबहुना त्याला चालना देण्याचे काम अंतुले साहेबांच्या काळात झाले. सरकारने त्यावर निर्णय घेऊन बेदखल कुळांचा प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न केला.

महोदय, मी कामगार क्षेत्रात काम करीत असल्यामुळे नम्रपणे सांगू इच्छितो की, या ठिकाणी अनेक गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मग त्यामध्ये आमदारांचा सन्मान असू द्या किंवा गतिमान प्रशासनाची उदाहरणे असू द्या. या निमित्ताने बॅ.अंतुले साहेबांच्या बाबतीत एक उदाहरण मी मुद्दाम सांगू इच्छितो. सैन्यातून खालच्या कॅडरमधील सैनिक वयाच्या 40 व्या वर्षी सेवानिवृत्त होतात आणि वरच्या कॅडरमधील व्यक्ती वयाच्या 50 व्या, 58 व्या किंवा 60 व्या वर्षी सेवानिवृत्त होतात. खालच्या कॅडरमधील सैनिक वयाची 40 वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवानिवृत्त होऊन घरी परतल्यानंतर ते कोठेतरी वॉचमन म्हणून काम करायचे. त्यावेळी सुरक्षा रक्षकांचे प्रचंड शोषण व्हायचे. बॅ.अंतुले साहेबांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शेवटच्या काळात म्हणजेच 1982 मध्ये महाराष्ट्र सिक्युरिटी ॲक्ट-1982, हा देशातील पहिला कायदा राज्यात केला, हे तुम्हा-आम्हाला इ ाात असावे म्हणून मी हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

अनेक गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. मी माननीय नामदार श्री. दिवाकर रावते साहेबांना नम्रपणे सांगू इच्छितो की, कदाचित कमी अधिकच्या गोष्टी आपल्याकडून किंवा विरोधकांकडून होत असतील. आम्ही आज विरोधक आहोत. कदाचित तो आमचा सागरी महामार्ग झाला नसेल. आपण माहिती घ्यावी. सागरी महामार्गाचे जवळपास 60 टक्के काम पूर्ण झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे, जे दोन महत्त्वाचे पूल सागरी महामार्गाला अडथळा आणत होते, तेही पूर्ण झालेले आहेत. आपण आपल्या सहकाऱ्यांना सांगितले ते बरे झाले. आता त्यासाठी 15 वर्षे लागण्याची काही गरज नाही. महाराष्ट्रातील जनता ठरवेल की, कोणाला किती काळ कुठे ठेवायचे. परंतु त्याचा संबंध या नामांतरासंबंधी किंवा नाव देण्यासंबंधी नसावा असे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. कोकणाच्या सुपुत्राने राज्यासाठी, कोकणासाठी जे केले ते तुम्हाला, आम्हाला येणाऱ्या तरूण पिढीला कायमस्वरूपी लक्षात राहण्यासाठी सागरी महामार्गाला त्यांचे नाव देण्यात यावे. बॅ. अंतुले साहेबांनी नुसते गतिमान प्रशासन दिले नाही तर साहित्य तयार केले आणि ज्याचा उल्लेख आपणही केला, मग त्यामध्ये महाजन अहवालाची चिरफाड असेल किंवा इतर अनेक गोष्टी असतील. मला वाटते की, त्यांचे साहित्य सुध्दा आपल्याला दीपस्तंभासारखे आहे. राजकीय क्षेत्रात वावरणारे सहकारी, आमच्यासारखे अभ्यासक यांच्यासाठी त्यांचे साहित्य राज्याच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध करून द्यावे अशी माझी विनंती आहे. राज्याच्या ग्रंथालयामध्ये काही प्रमाणात ते आहे. मी त्या संदर्भात तपासणी केली आहे.

सभापती महोदय, बॅ. अंतुले साहेब एक वादळी व्यक्तिमत्व होते तर मुरली देवरा हे अतिशय मृदू व्यक्तिमत्व होते. हे दोन टोके होती. ही दोन्ही काँग्रेसची नेतृत्वं काळाच्या पडद्याआड गेली आहेत. यामुळे काँग्रेसचे प्रचंड नुकसान झाले आहे. देशाच्या, राज्याच्या राजकारणाचे तसेच समाजकारणाचे सुध्दा नुकसान झाले आहे. गेली 22 वर्षे सतत "मुंबई प्रदेश काँग्रेस" म्हटले जाते. देशात असे एकही शहर नसेल की, त्याला प्रदेश काँग्रेस जोडले आहे. फक्त मुंबई हे एकच शहर असे आहे की, त्याचे प्रदेश काँग्रेस म्हणून संबोधन केले जाते. देशाच्या कोणत्याही शहरात शहर काँग्रेस असते, जिल्हा काँग्रेस असते प्रदेश कॉंग्रेस नसते. हे काम फक्त आमच्या नेत्यांनी केले.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

कारण त्यावेळी मुंबई प्रदेश हा वेगळा प्रदेशच होता, राज्य होते. ते कायम ठेवण्यासाठी मुंबई प्रदेश असा उल्लेख केला जातो. 22 वर्षे सातत्याने ते त्याचे अध्यक्ष राहिले. अनेक बाबतीत त्यांनी लक्ष घातले. मी त्यांच्याच नेतृत्वाखाली त्यांच्या आशीर्वादाने दक्षिण मुंबईमध्ये सन 2004 मध्ये लढलो आणि जिंकलो. मी विधानसभेत सदस्य होतो. डिलिमिटेशनमध्ये माझा मतदारसंध रद्द झाला म्हणून मला माझा विभाग दुसरीकडे करावा लागला. ते सातत्याने 4 वेळा लोकसभेत व 5 वेळा राज्यसभेत निवडून आले. भारतामधील फार कमी व्यक्तिमत्वे अशी असतील आणि त्यातील एक व्यक्तिमत्व म्हणजे सन्माननीय मुरली देवराजी.

सभापती महोदय, केंद्र शासनाने, राज्य शासनाने पॅकेज दिले पाहिजे अशा गोष्टी आपण करतो. देशभर कोणीही असे मानत नव्हते की, हे नेतृत्व पुढे ऊर्जा देऊ शकेल. परंतु आणीबाणीच्या काळानंतर या व्यक्तीने इंदिरा गांधीना मुंबईमध्ये पायी फिरविले. मी त्यावेळी राजकारणात नव्हतो. मी त्यावेळी कॉलेजमध्ये होतो. एनएसयुआयचा जनरल सेक्रेटरी होतो. इंदिरा गांधी म्हणजे आमच्यासाठी मोठ्या पर्वणी होत्या. त्या परिसरात पायी चालताना आजही सर्व आठवते. इंदिरा गांधींनी राजीव गांधींना सांगितले की, त्यांचा जन्म मुंबईला झाला होता, त्यांनी मुंबईत फिरावे. राजीव गांधी मुंबईत फिरले. मुंबईत फिरताना झोपडपट्टीच्या बाबतीत त्यांनी सांगितले की, आपल्याला यासाठी काही तरी करणे आवश्यक आहे. मग त्यातून एसआरडी निर्माण झाले, एसआरए निर्माण झाले. आता पुढे काय होईल हे माहीत नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

त्यावेळी सर्वात पहिल्यांदा पॅकेज दिले गेले. मुंबईसाठी 100 कोटी रुपयांचे पॅकेज मिळविण्याचे काम सन्माननीय श्री.मुरली देवरा यांनी केले. सन्माननीय श्री.मुरली देवरा यांना केलेल्या अशा अनेक कामांचा उल्लेख आपल्याला येथे करता येऊ शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे यांचेही दु:खद निधन झाले आहे. माझा आणि त्यांचा फारसा कधी संबंध आला नाही. परंतु हे मला माहीत आहे की, 'माय फ्रेंड', हा शब्दप्रयोग परवलीचा करण्याचे काम त्यांनी केले आहे. आजही हा शब्द अनेक सन्माननीय सदस्य आपल्या भाषणात वापरीत असतात.

सभापती महोदय, या सर्व दिवंगत झालेल्या सन्माननीय नेत्यांना मी माझ्या व माझ्या कुटुंबीयांतर्फे आणि माझ्या पक्षातर्फे श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

--------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे (राज्यपालांव्दारे नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ.अ.र.अंतुले, माजी केंद्रीय मंत्री श्री.मुरली देवरा आणि माजी विधान पारिषद सदस्य श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला सहमती दर्शविण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बॅ.अंतुले साहेबांबद्दल अनेक वक्त्यांनी त्यांच्या भाषणातून अत्यंत उत्कट अशा भावना व्यक्त केल्या आहेत. एक विचारवंत असे म्हणतात की, "Some people break-down at the time of difficulty, but some people who break the records are great people." अंतुले साहेबांचे व्यक्तिमत्त्व असे होते की, कोणत्याही संकटाचा न डगमगता, खंबीरपणे मुकाबला करण्याचे धाडस त्यांच्यामध्ये होते. एक कवी असे म्हणतात की, "लहरों से डरकर नैया पार नहीं होती, कोशिश करने वालो की कभी हार नही होती."

सभापती महोदय, अनेकांनी सिमेंट वाटप, प्रतिभा प्रतिष्ठान या संदर्भातील घटनांचा उल्लेख केला आहे. परंतु या सर्व घटनांचा त्यांनी धाडसाने मुकाबला केला. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून भरारी घेऊन अंतुले साहेबांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. जातीच्या, धर्माच्या भिंती तोडून आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद किंवा केंद्रीय मंत्री पद काबीज करणे साधी गोष्ट नाही. या राज्याला छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभला आहे. शिवबांची भवानी तलवार परदेशातून आपल्या देशात आली पाहिजे, यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. या संदर्भात लोकांनी त्यांची थट्टामस्करी सुध्दा केली. परंतु शिवबांची भवानी तलवार महाराष्ट्रात आली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. आताच्या सरकारने त्यांचे हे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आमदारांचा सन्मान वाढला पाहिजे, यासाठीचे प्रयत्न करीत असतानाच जनतेचा सन्मान कसा वाढेल, या देशातील पत्रकारांचा सन्मान कसा वाढेल, गरिबांचा सन्मान कसा वाढेल, सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांचा सन्मान कसा वाढेल, यासाठी देखील त्यांनी काम केले आहे. माझी आणि अंतुले साहेबांची केवळ तीन वेळा भेट झाली होती. एकदा अंतुले साहेबांनी मुख्यमंत्री असताना या मुंबई नगरीमध्ये राज्यातील खेड्यापाड्यातील, तालुका, जिल्हा पातळीवरील वर्तमानपत्रांच्या संपादकांचे एक सम्मेलन ओबेरॉय शेरेटॉन या हॉटेलमध्ये आयोजित केले होते. यानंतर श्री.अजित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

त्या संमेलनाला साप्ताहिक जय भीमचा संपादक म्हणून मला देखील आमंत्रित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील छोट्या छोटया पत्रकारांचे, संपादकांचे संमेलन भरवून त्यांना मदत करण्याचे काम, त्यांना सहकार्य करण्याचे काम बॅ. अंतुले साहेबांनी केले. तो दिवस मी कधी विसरु शकत नाही.

सभापती महोदय, मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी नामांतराचे आंदोलन सुरु होते. दलित मुक्ती सेनेचे आंदोलन सुरु होते. अधिवेशन काळात दलित मुक्ती सेनेचा मोर्चा काढण्यात आला. मोर्चाचे नाव बांगडी मोर्चा असे होते. त्या मोर्चामध्ये "अंतुले साहेब नामांतर करा नाही तर हातात बांगड्या भरा" अशा प्रकारच्या घोषणा दिल्या जात होत्या. मोर्चामध्ये हजारो महिला सामील झाल्या होत्या. त्यावेळी माझा मुक्काम रमाबाई आंबेडकर झोपडपट्टीमध्ये होता. बॅ. अंतुले साहेबांनी एका पोलीस अधिकाऱ्याला तेथे पाठवून मला वर्षा बंगल्यावर निमंत्रित केले. मी रात्री 11.30 वाजता वर्षा बंगल्यावर गेलो. अंतुले साहेब मला म्हणाले की, मला तुम्ही बांगड्यांचा अहेर दिला, ठीक आहे. पण एक गोष्ट मी निश्चितपणे सांगतो की, मी माझ्या कोकणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने निश्चितपणे विद्यापीठ स्थापन करतो. मी त्यांना म्हणालो की, तुम्ही अशी 10 विद्यापीठे स्थापन करा, पण विधिमंडळामध्ये जो ठराव एकमताने संमत झालेला आहे त्यांची अंमलबजावणी तुम्ही करता की नाही हे सांगा. ते म्हणाले की, ती अंमलबजावणी होईल तेव्हा होईल, पण मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने कोकणामध्ये विद्यापीठ स्थापन करीन. ही त्यांची आणि माझी दुसरी भेट होती. त्यानंतर रायगड जिल्हयातील लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात आले. संपूर्ण देशातील विद्यार्थी त्या तंत्र विद्यापीठामध्ये आज शिकण्यासाठी येत आहेत. या विद्यापीठाच्या निमित्ताने त्यांनी कोकणाचा आणि महाराष्ट्राचा गौरव वाढविण्याचे काम केले.

सभापती महोदय, स्वातंत्र्याच्या लढयामध्ये जे हुतात्मे झाले, जे शहीद झाले त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ ठिकठिकाणी स्मारके निर्माण केली. ही स्मारके आजही त्यांच्या कर्तृत्वाची, धैर्याची आणि शौर्याची आठवण करुन देत आहेत.

सभापती महोदय, माझी त्यांच्या बरोबरची तिसरी भेट ही आमच्या पक्षाची कॉंग्रेस पक्षाशी युती असताना झाली. बॅ. अंतुले साहेब हे औरंगाबाद मधून लोकसभा निवडणुकीसाठी उभे राहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

होते. त्यावेळी त्यांचा मला फोन आला. ते मला म्हणाले की, कवाडे साहेब नामांतराच्या निमित्ताने औरंगाबादमध्ये तुमचा फार मोठा प्रभाव आहे, त्यामुळे कृपा करुन तुम्ही माझ्या प्रचारासाठी यावे. त्यावेळी मी एक दिवस त्यांच्या प्रचारासाठी दिला होता.

सभापती महोदय, बॅ. अंतुले साहेबांनी प्रशासनाचे, सत्तेचे विकेंद्रीकरण केले. आज दुष्काळी परिस्थितीसंबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्यात आलेली आहे. दुष्काळामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतात. अशाच एका दुष्काळाच्या प्रसंगी राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांच्या निर्णयास रिझर्व्ह बँकेने विरोध केला होता. परंतु तो विरोध न जुमानता धाडसाने त्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अंतुले साहेबांचे उचित स्मारक व्हावे अशी सूचना केली. सागरी महामार्गाला अंतुले साहेबांचे नाव दिले तर ते त्यांचे चिरंतन असे स्मारक होईल असे मला वाटते.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

माझ्या वतीने आणि माझ्या पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दिवंगत बॅ.अंतुले साहेबांच्या स्मृतीला श्रध्दांजली अर्पण करतो.

माजी केंद्रीय मंत्री स्व.मुरली देवरा हे कॉँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ आणि गांधी परिवाराशी जवळीक असलेले नेते होते. स्व.स.का.पाटील यांच्यानंतर बॅ.रजनी पटेल यांच्या सहवासात तयार झालेले मुरली देवरा यांनी मुंबईचे आणि कालांतराने देशाचे नेतृत्व करीत असताना उत्कृष्ट कामगिरी केली. महाराष्ट्राच्या विकासामध्ये त्यांनी मोठा हातभार लावला. त्यांच्या स्मृतीला मी श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे हे सातारा जिल्हयातील नेते होते. त्यांनी 'My freind' हा सुंदर परवलीचा शब्द आम्हाला दिला आणि सर्वांना मैत्रीच्या धाग्यामध्ये गुंफण्याचे काम त्यांनी केले. बॅ.अंतुले या महाराष्ट्राच्या थोर नेत्यास, मुरली देवरा, माजी केंद्रीय मंत्री आणि भास्करराव शिंदे या तीनही दिवंगत नेत्यांना माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण संपवितो. जय भीम.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बॅ.अंतुले यांचे दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजी निधन झाले. त्याच्या पाच-सहा दिवस अगोदर माझ्या जिल्हयाचे दुसरे एक नेते राज्याचे माजी उपमंत्री भाऊसाहेब खानविलकर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. खरे म्हणजे या दोन्ही नेत्यांच्या निधनानंतर रायगड जिल्हयातील 1960 च्या दशकातील सामाजिक काम करणारी सर्व पक्षीय पिढी काळाच्या पडद्याआड गेली असे दुर्दैवाने मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

माननीय मुख्यमंत्री, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे व इतर माननीय सदस्यांनी श्रध्दांजली अर्पण करीत असताना बॅ.अंतुले यांनी घेतलेल्या अनेक महत्वाकांक्षी निर्णयांचा उल्लेख केला. सागरी महामार्गाबद्दल अनेकांनी उल्लेख केला. गोरगरिबांच्या हिताच्या आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा उल्लेख केला गेला. माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी त्यांच्या गावातील आंबेत खाडीवरील पुलाचा उल्लेख केला. मुरुड आणि अलिबाग या भागाचा खऱ्या अर्थाने पर्यटन स्थळामध्ये समावेश होण्यामागे रेवदंडा-साळाव खाडी पुलाला अनन्यसाधारण महत्व आहे. बॅ.अंतुले यांच्या कामाचा हा एक मोठा पुरावा आहे. अलिबाग आणि मुरुड हे समोरासमोर असलेले तालुके आहेत. परंतु दोन्ही तालुक्यांच्या मध्ये समुद्राचा मोठा भाग असल्यामुळे त्या ठिकाणी पूल उभारुन रोहा येथून मुरुड येथे जाण्याकरिता जो 60 कि.मी.चा फेरा व्हायचा तो कमी झाला आणि पुलाच्या निर्मितीमुळे मुरुड तालुक्याचा विकास झाला.

सभापती महोदय, बॅ.अंतुले, भाऊसाहेब खानविलकर, दादासाहेब सावंत, माझे वडील दत्तात्रय तटकरे असतील हे आज काळाच्या पडद्याआड गेले आहेत. आज जरी वेगवेगळ्या पक्ष आले असले तरी प्रामुख्याने रायगड जिल्हयाचे राजकारण शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेस पक्षाभोवती केंद्रीत राहिले. आमच्या जिल्हयातील विविध राजकीय पक्षाची समकालीन पिढी काळाच्या पडद्याआड गेली आहे. दि.बा.पाटील, दत्ता पाटील, प्रा.र.सानप, प्रभाकर पाटील यांचा त्यामध्ये समावेश आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल तटकरे...

रायगडच्या राजकारणात दबदबा असलेली एक पिढी अस्तंगत झाली. अंतुले साहेबांच्या वेगवेगळ्या पैलूंचा उल्लेख येथे केला गेला खरा पण त्यांच्यावर एकेकाळी फार मोठा आघात झाला होता तो म्हणजे त्यांना आलेला हृदयविकाराचा झटका. त्यावेळेस त्यांच्या पत्नी श्रीमती नर्गिस यांची त्यांच्या प्रती आणि परमेश्वराजवळ अत्यंत निष्ठा होती. तेव्हा तर अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, अंतुले साहेबांचे जवळजवळ देहावसान झाले पण केवळ एक शेवटचा सोपस्कार म्हणून जे उपचार करावे लागतात ते डॉक्टरांनी केले आणि त्यांचे आयुष्य वाढले आणि हे मला तरी वाटते की त्यांच्या प्रती श्रध्दा असणाऱ्यांनी केलेले कुरान पठन आणि परमेश्वराकडील प्रार्थना याचेच फलित होते. बॅ. अंतुले साहेब सुध्दा हे नंतर सांगत होते की, "त्या वेळेस मी जवळजवळ मृतच झालो होतो." सभागृहात माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांनी अनेक उदाहरणे आमच्या कौटुंबिक प्रसंगांबाबत सांगितली. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी देखील अनेक प्रसगांची आठवण करुन दिली. एकदा साहेबांच्या मातोश्रींचे निधन झाल्यानंतर अचानक अंतुले साहेबांची गाडी नादुरुस्त झाली तेव्हा मी आणि तटकरे साहेब त्यांना घेऊन गेलो होतो तेव्हा पाच वाजले होते. माझ्या वडिलांचे निधन देखील त्याच वर्षात झालेले होते. अशा दु:खाच्या प्रसंगात देखील श्रीमती नर्गिस काकी यांनी आम्हाला अत्यंत प्रेमाने जेवायला घातले होते, असे अनेक प्रसंग आहेत. बॅ. अंतुले साहेबांनी अनेक महत्वाचे निर्णय त्यांच्या काळात घेतले व त्यांची धडाडीने अंमल बजावणी सुध्दा केली. त्यांच्या स्मारकाचा विषय येथे चर्चिला गेला तद्वतच त्यांचे नाव सागरी महामार्गाला देण्याचीही सूचना केली, तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील देशासाठी रक्त सांडणाऱ्या हुतात्म्यांच्या स्मारकांबाबतचा उल्लेख केला या सर्व सूचनांना मी अनुमोदन देतो. सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे की, तालुका व जिल्हा स्तरावर या स्मारकांची अवस्था अत्यंत शोचनीय अशीच आहेत. या स्मारकांप्रती आदर व्यक्त करणे दूरच पण अनैतिक धंद्यांचे अड्डे या ठिकाणी बनविण्यात आलेले दिसून येतील. अशा सर्व स्मारकांची देखभाल होऊन ती सुस्थितीत राहून त्यांचे पावित्र्य कसे राखले जाईल, यादृष्टीने लक्ष घालण्याची गरज आहे एवढे बोलून त्यांच्या कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती परमेश्वर देवो अशी मी प्रार्थना करतो आणि पुन्हा त्यांना आदरांजली व्यक्त करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल तटकरे.....

यानंतर काँग्रेसचे नेते व माजी केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा, भास्करराव शिंदे आणि उदरयसिंह गायकवाड यां नेत्यांनाही मी श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

**सभापती** : शोक प्रस्तावावर सभागृहाचे नेते, माननीय विरोधी पक्षनेते, गटनेते या मर्यादेपर्यंत बोलण्यास आपण परवानगी देतो पण आज बॅ. अंतुले आणि श्री. मुरली देवराजींसारख्या नेत्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी एक अपवाद म्हणून मी इतर सन्माननीय सदस्यांनाही बोलण्यास अनुमती दिली आहे. पण अशी परवानगी दिल्यानंतर 20-20 मिनिटांचे भाषण करणे उचित होणार नाही. माझ्याकडे अजूनही 3-4 नावे आलेली आहेत, त्यांनी अगदी थोडक्यात आपले विचार व्यक्त करावेत, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, अतिशय मोठी व्यक्तिमत्वे काळाच्या पडद्याआड जातात त्यावेळी नियम थोडासा सैल करून किंवा जी परंपरा घालून दिलेली आहे, त्यामध्ये थोडासा अपवाद करून आम्हाला काही बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभागृहाचे नेते आदरणीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री, श्री.मुरली देवरा, माजी केंद्रीय मंत्री, श्री.भास्करराव शिंदे, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आह, त्यांच्याप्रती आम्हा सर्वच सन्माननीय सदस्यांना भावना व्यक्त करावयाच्या आहेत.

बॅ.अंतुले यांच्याबद्दल बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी किंवा ज्यांचा त्यांच्याशी अगदी जवळून संबंध होता, राजकारणात त्यांच्या बरोबर ज्यांनी कामे केली त्यांनी बॅ.अंतुले ही काय चीज होती हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी देखील त्यांच्या बद्दलचे काही मुद्दे येथे सांगणार आहे. अगदी थोडक्यात सांगावयाचे झाले तर त्यांचे शिक्षण गरिबीतून झाले हे सर्वानाच माहीत आहे. ज्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना परदेशी जाण्यासाठी कुठल्या तरी एका संस्थानाने मदत केली होती, त्यामुळे ते आपले शिक्षण पूर्ण करू शकले. श्री.गुलाम मोहम्मद कर्दने नावाच्या एका व्यक्तीने श्री.अंतुले यांच्याशी परिचय नसताना देखील यांना परदेशी पाठवून बॅरिस्टर ही पदवी प्राप्त करण्यासाठी अतिशय चांगल्या पद्धतीने मदत केली आहे. राज्यकर्ते आणि प्रशासन यामधील सीमा रेषा धूसर असल्या तरी बॅ.अंतुले स्पष्टपणे राज्यकर्त्यांचीच भूमिका पार पाडायचे या बाबतीत ते अतिशय कर्तव्यदक्ष होते.

बॅ.अंतुले हे विधी व न्याय विभागाचे माननीय मंत्री असताना एक प्रसंग मला आठवतो. त्यावेळचे ॲडव्होकेट जनरल फार प्रसिद्ध होते. त्यांचा फार मोठा दबदबा होता. तो पर्यंतची अशी अवस्था होती की, जे कोणी कायदा मंत्री असतील त्यांना काही सल्लामसलत हवी असेल तर कायदा मंत्री हे ॲडव्होकेट जनरलकडे जात होते. तशी एक पद्धत व परंपरा होती. बॅ.अंतुले जेव्हा मंत्री झाले तेव्हा त्यांनी सांगितले की, मी या खात्याचा मंत्री आहे. मी स्वत: त्यांच्याकडे जाऊ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

शकणार नाही. आवश्यकता असेल तर त्यांनी यावे. मी येथे ॲडव्होकेट जनरल कोण होते हे सांगणार नाही. पण त्यावेळी कोण ॲडव्होकेट जनरल होते हे बहुतेकांच्या लक्षात येईल. यावर तोडगा काढण्याचा प्रसंग माननीय मुख्यमंत्र्यांवर आला. यातून सुटका करावयाची होती म्हणून राज्यामध्ये ॲडिशनल ॲडव्होकेट जनरल पद निर्माण करण्यात आले. त्या पदावर दुसरे-तिसरे कोणी नाही तर बॅ.रामराव आदिक यांची नेमणूक करण्यात आली व मग बॅ.रामराव आदिकांच्या मार्फत हा संवाद पुन्हा सुरू झाला. बॅ.अंतुले यांनी सांभाळलेल्या खात्यांचा विचार करतो त्यावेळी ते सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री असतानाचा एक प्रसंग आठवतो. सार्वजनिक बांधकाम खात्याचे मुख्य अभियंता बऱ्याच अडचणी सांगत होते. ते त्यातील कायदेशीर अडचणी जास्त सांगत होते. तेव्हा बॅ.अंतुले साहेबांनी सांगितले की, मी मंत्री असलो तरी त्या आधी बॅरिस्टर आहे. त्यामुळे आपल्या पेक्षा जास्त कायदेशीर अडचणी मला समजतात. कृपा करून मला कायदेशीर अडचणी सांगू नका. आपण तंत्रज्ञानी आहात. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने ज्या अडचणी असतील त्या आपण सोडवायला मदत करावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

जनता दरबार हा बॅ.अंतुले यांच्या काळापासून सुरू झाला. अनेक लोक त्यावेळी स्वतःच्या अडचणी किंवा तक्रारी घेऊन यायचे. एक पोलीस निलंबित झाला होता. त्याची पत्नी त्या जनता दरबारामध्ये आली होती आणि सांगितले की, माझे पती निलंबित झाले आहेत, त्यामुळे आमचे सरकारी घर काढून घेण्यात आले आहे. पर्यायाने मी रस्त्यावर आली आहे. आपण मला मदत केली पाहिजे. जनता दरबारामध्ये काय होऊ शकते याचा आदर्श धडा त्या उदाहरणातून मिळतो. त्यांनी विचारले की, निलंबन कशामुळे झाले ? आपल्या डयुटीमध्ये कुचराई केल्याचे कारण देऊन त्यांना निलंबित करण्यात आले.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.. ..

त्या स्त्रीचे म्हणणे ऐकल्यानंतर माननीय अंतुले साहेबांनी आय.जी. यांना सूचना केली की,या प्रकरणाची चौकशी करा, या पोलिसाने नोकरी किती वर्ष केली, या अगोदर किती वेळा मेमो देण्यात आले होते व ही कारवाई कशामुळे झाली आहे या सर्वांची माहिती मला 3 तासांच्या आत मिळाली पाहिजे. यासंदर्भातील अहवाल मिळाल्यानतर असे लक्षात आले की, हा कॉन्स्टेबल निवृत्तीला आलेला होता, 30 वर्षाच्या सेवेत त्याला एकदाही मेमो मिळालेला नव्हता, एकदा कोठे कामावर येण्यात थोडा उशीर झाला होता म्हणून त्याला ताबडतोब तडकाफडकी निलंबित करण्यात आले होते. या विषयाच्या संदर्भात आज संध्याकाळपर्यंत या कॉन्स्टेबलचे निलंबन मागे घेऊन त्याला घर परत मिळालेले आहे, असा निरोप रात्री कितीही उशीर झाला तरी मला तुमच्याकडून फोन आला पाहिजे व हा फोन येईपर्यंत मी फोनची वाट पाहणार आहे.

सभापती महोदय, मला आश्चर्य वाटते की, सत्ताधारी व विरोधी पक्षाला आता नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग करुन घेता येतो, तशी टेक्नॉलॉजी माननीय अंतुले साहेबांच्या काळात उपलब्ध असती तर त्यांच्या काळात अजून वेगळे चमत्कार आपल्याला बघायला मिळाले असते.

माननीय अंतुले साहेबांचे सर्वच क्षेत्रावर प्रेम होते. कोणताही निर्णय घेण्याच्या बाबतीत एक प्रकारची रिस्क असते. मुख्यमंत्री किंवा मंत्री म्हणून निर्णय घेताना रिस्क निश्चित असते परंतु ती रिस्क घेण्यासाठी प्रशासनाची बॉर्डर लाईन सोडून त्याच्या पलीकडे विचार करावा लागत असतो.

माननीय अंतुले साहेबांच्या संदर्भात मला सांगावेसे वाटते की, राज्यातर्फे जे सांस्कृतिक पुरस्कार दिले जातात त्यामध्ये किर्तन कलेला स्थान देण्यात आले नव्हते. एकदा पुण्याच्या सर्कीट हाऊसमध्ये माननीय अंतुले साहेबाच्या समोर बाळासाहेब भारदे यांनी स्वत: किर्तन करुन दाखवले. या कार्यक्रमासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुध्दा बोलावण्यात आले होते. त्यावेळेस अधिकाऱ्यांनी किर्तनाच्या व्याख्येत तांत्रिक अडचणी येतील असा सल्ला दिला. त्यावेळी माननीय अंतुले साहेबांनी सांगितले की, किर्तन म्हणजे "लय, विनय आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम करणारी कला म्हणजे किर्तन". इतके संक्षिप्त वर्णन समर्पक शब्दात करण्याची ताकद माननीय अंतुले साहेबांमध्ये होती. माननीय अंतुले साहेबांच्या संदर्भात अनेक विषय आहेत परंतु लोकांमध्ये राहणारा, लोकांसाठी आपल्या आयुष्यातील सर्वस्व देणारा हा नेता असल्यामुळे जनतेच्या हृदयात ते कायमचे बसले होते. जनतेच्या हृदयात बसलेला नेता आज आपल्यातून निघून गेला आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.. ..

माननीय अंतुले साहेबांची आठवण चिरंतन राहावी यासाठी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. शासन आणि प्रशासन यामधील उच्चस्तरीय शिक्षण देणारी संस्था अंतुले साहेबांच्या नावाने सुरु केली आणि त्यायोगे एक नवीन पिढी तयार झाली तर खचितच माननीय अंतुले साहेबांची आठवण आपल्या राज्याला कायमची राहील.

सन्माननीय अंतुले साहेबांबरोबरच दिवगंत झालेले माजी केंद्रीय मंत्री, श्री. मुरली देवरा, माजी विधान परिषद सदस्य श्री. भास्करराव शिंदे या दोघांनाही माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो व माझे विचार येथेच थांबवतो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी बॅ.अब्दुल रहेमान अंतुले,माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री श्री. भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या संदर्भात जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन करण्यासाठी व त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, समाजकारण व राजकारणाच्या माध्यमातून कार्यकर्ते व नेते तयार होत असतात. परंतु काही माणसे जन्मानेच नेते असतात व त्यापैकी बॅ.अंतुले साहेब हे एक होते.

सभापती महोदय, हिंदू धर्मात राम, कृष्ण व कृष्णाचे वेगवेगळे अवतार असून वेगवेगळया माध्यमातून त्यांची नावे घेतली जात असतात. देवांची नावे आपल्या मुलांना ठेवल्यामुळे त्या नावाची पर्सनॅलिटी, कर्तृत्वाचा फायदा समाजाला मिळावा यासाठी देवांची नावे ठेवली जात असतात.

अल्लाहची एकंदर 99 नावे असून त्यातील एक नाव अब्दुल हे आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन..

"रहेमान" याचा अर्थ "रहेम करनेवाला रहेम दिल", समाजासाठी जगणारा, समाजाला देणारा, लोकहितासाठी जगणारा. अंतुले साहेबांच्या आईवडिलांनी ठेवलेल्या नावाप्रमाणे त्यांनी आपले कर्तृत्व आणि कार्य पार पाडले.

सभापती महोदय, बॅ.अब्दुल रहेमान अंतुले यांनी केलेली कामे देशातील आणि राज्यातील जनता कधीही विसरणार नाही.

सभापती महोदय, हिंदू मॅथॉलॉजीमध्ये असे म्हटले जाते की, एका नावाचा उल्लेख बारा हजार वेळा केला की त्या नावाचा प्रभाव त्या व्यक्तीवर पडतो. तसाच प्रभाव अब्दुल रहेमान अंतुले यांच्यावर पडला होता आणि त्याप्रमाणे त्यांनी राज्यात चांगले काम केले होते.

सभापती महोदय, या ठिकाणी बॅ.अंतुले यांच्याबद्दल अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. बॅ.अंतुले यांच्या चांगल्या कामाबद्दल बोलायचे ठरविले तर आपणास एक दिवस देखील कमी पडेल. कारण बॅ.अंतुले यांनी प्रत्येक घटकातील गोरगरिबांचा विचार केला. त्यांनी प्रशासनातील प्रत्येक पैलूंवर व्हीजन, मिशन आणि एक्झीक्युशन करण्याचे काम केले. नेत्यांकडे फक्त व्हीजन असून उपयोगाचे नाही तर त्यांच्याकडे मिशन देखील असणे आवश्यक आहे. बॅ.अंतुले यांच्याकडे व्हीजन होते, मिशन होते आणि त्यांनी ते एक्झीक्युशन करुन दाखविले. बॅ.अंतुले साहेबांना मुख्यमंत्री म्हणून फक्त 18 महिने काम करण्याची संधी मिळाली असली तरी त्यांनी या 18 महिन्याच्या कालावधीत 180 वर्षांचे काम केले आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते उपस्थित नाहीत. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बॅ.अंतुले साहेब हे अल्पसंख्याक समाजाचे असले तरी ते कधीही अल्पसंख्याक समाजाचे वाटले नाहीत. माननीय श्री.दिवाकर रावते म्हणाले ते बरोबर आहे. ते अल्पसंख्याक समाजाचे होते आणि त्यांनी ज्या पद्धतीने काम केले त्यावरुन ते या समाजाचे रोल मॉडेल होते आणि त्याचा प्रभाव इतका झाला की, मागील 30-35 वर्षामध्ये कोकणामध्ये अल्पसंख्याक समाजाच्या शिक्षणाची टक्केवारी 200 पटीने वाढली. फक्त कोकणात शिक्षणाची टक्केवारी वाढली नाही तर महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये देखील अल्पसंख्याक समाजाची शिक्षणाची टक्केवारी वाढली. रोल मॉडेल नेता कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन..

बॅ.ओ.आर.अंतुले साहेब आहेत. अल्पसंख्याकामधील सुशिक्षित नेता असेल तर तो समाजासाठी कसे योगदान देऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे बॅ.अंतुलेसाहेब आहेत.

सभापती महोदय, बॅ.अंतुले साहेब हयात असताना आणि नसताना सुद्धा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना, विविध समाजातील लोकांना त्यांच्याकडून शिकायला मिळाले. केंद्रामध्ये आरोग्य मंत्री असताना उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान व देशातील अन्य भागात त्यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी बॅ.अंतुले यांच्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करीत असताना काही सूचना केल्या. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कोस्टल रोडला बॅ.अंतुले यांचे नाव द्यावे. माझी अशी सूचना आहे की, मुंबई विधान भवनाच्या प्रांगणात बॅ.अंतुले यांचा पुतळा उभारण्यात यावा. आपण तसे केल्यास त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली अर्पण केल्यासारखे होईल.

सभापती महोदय, कै.मुरली देवरा साहेब एक चांगले व प्रेमळ व्यक्तिमत्व होते. त्यांना भेटायला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते "बेटा" म्हणून हाक मारायचे. मग त्यांना भेटणारी व्यक्ती 90 वर्षाची असली तरी त्यांना ते "बेटा" म्हणूनच हाक मारायचे. अशी ती प्रेमळ व्यक्ती होती.

कै.मुरली देवरा हे अत्यंत अभ्यासू होते. मुंबई शहराच्या विकासाचा प्रश्न असेल, पक्षाचा विषय असेल, कार्यकर्त्यांना सांभाळण्याचा विषय असेल ते अत्यंत चांगल्या पद्धतीने मार्ग काढायचे. त्यांचा हा गुण आपण सर्वांनी घेण्यासारखा आहे. अशा या थोर नेत्याचे, कुशल संघटकाचे मंगळवार, दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना माझ्यातर्फे व माझ्या पक्षाच्या वतीने आदरांजली अर्पण करतो.

तसेच कै.भास्करराव शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना आदरांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

यानंतर श्री .बोर्डे........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन घडविणारी बरीच महान नेते मंडळी जन्माला आली. समाजाचे पांग फेडणारी ही मंडळी होती. शोक प्रस्तावावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या असतात. सभापती महोदय, आपण सांगितले होते की, शोक प्रस्तावावर गट नेते आणि ठराविक काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल. संसदीय कार्य राज्यमंत्री या नात्याने मला वाटते की, सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळले तर इतरही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळू शकेल आणि आम्हाला सुध्दा त्यांच्या भावना ऐकता येतील.

**सभापती** : आता सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. गेली पाच दशके सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपला अमिट ठसा उमटविलेले, धडाडीचे प्रशासक आणि द्रष्टा नेता म्हणून, मुख्यमंत्री म्हणून नावलौकिक मिळविलेले बॅ.अंतुले साहेबांचे मंगळवार, दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजी मुंबईत ब्रीच कँडी हॉस्पीटल येथे किडनीच्या आजाराने दु:खद निधन झाले.

महोदय, अंतुले साहेबांचा जन्म दिनांक 9 फेब्रुवारी, 1929 रोजी रायगड जिल्ह्यातील आंबेत येथे झाला. मुंबई विद्यापीठातून पदवीपर्यंतचे शिक्षण प्राप्त करुन अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेतले आणि त्यानंतर बॅरिस्टरची पदवी देखील प्राप्त केली. त्यामुळे अंतुले हे 'बॅ.अंतुले' या नावाने ते परिचित झाले.

महोदय, कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत बॅ.अंतुले साहेबांचा आणि माझा जवळून संबंध आला. निवडणुकीत निवडून आल्यानंतर मी ज्यावेळी अंतुले साहेबांना भेटायला गेलो त्यावेळी त्यांनी सांगितले की, "निरंजन, तू नव्हे तर माझा मुलगा मुश्ताक निवडणुकीला उभा आहे असे समजून मी निवडणुकीत काम केले. तू निवडून आला आहेस. आता तू एक लोकप्रतिनिधी म्हणून जास्तीत जास्त लोकांसाठी काय करु शकशील हे बघणे अधिक गरजेचे आहे." मला वाटले माझी त्यांच्या बरोबर 15 मिनिटे चर्चा होईल. पण माझी आणि त्यांची 45 मिनिटे चर्चा झाली आणि त्यात त्यांनी मला अनेक जुन्या आठवणी सांगितल्या. त्यांची इंदिरा गांधी यांच्या बरोबर लंडन येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने झालेली भेट आणि त्या भेटीत त्यांचे आणि इंदिरा गांधींमध्ये झाले संभाषण त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, त्या भेटीत इंदिराजी मला म्हणाल्या होत्या की, तुमच्यासारख्या तरुणाची भारताला गरज आहे आणि तुम्ही भारतात येऊन काम करा. त्यापुढील इतिहास सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितला आहे. त्यामुळे मी फार काही सविस्तरपणे सांगणार नाही. पण आणीबाणीच्या काळामध्ये इंदिराजींवर संपूर्ण भारतभर टीकेची झोड उठली होती. त्यावेळी अंतुले साहेबांनी त्या परिस्थितीत इंदिराजींची पूर्णपणे पाठराखण केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे....

महोदय, संजय गांधी निराधार यो्जनेचे जनक म्हणून अंतुले साहेबांची ओळख निर्माण झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अंतुले साहेबांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात गडचिरोली, सिंधुदुर्ग, रायगड, जालना व लातूर या नवीन जिल्ह्यांची तडकाफडकी निर्मिती केली. अशा प्रकारे नवीन जिल्हे निर्माण करुन त्यांनी एकप्रकारे आपला प्रशासकीय वकूब दाखवून दिला.

महोदय, अंतुले साहेबांचे छत्रपती शिवाजी महाराजांवर असीम प्रेम होते. हे त्यांच्या बोलण्यातून समजायचे. त्यांच्यामुळेच आज मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर महाराजांचे तैलचित्र दिसते. महाराजांची भवानी तलवार लंडनहून आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी अंतुले साहेबांच्या शिवप्रेमाबाबतची जाणीव करुन दिलेली आहे. या निमित्ताने मी अंतुले साहेबांनी सांगितलेली एक आठवण सांगतो. 1995 मध्ये युती शासन सत्तेत आले. त्यावेळी माननीय श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री असलेल्या मनोहर जोशी साहेबांनी माननीय श्री.बाळासाहेबांना मंत्रालयात आणले होते. त्यावेळी बाळेसाहेबांनी मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळील शिवाजी महाराजांच्या तैलचित्रासमोर नतमस्तक होऊन नमस्कार केला. त्यानंतर ते मुख्यमंत्र्यांच्या दालनात गेले आणि तेथून अंतुले साहेबांना फोन करुन सांगितले की, तुमच्यामुळे मला महाराजांच्या तैलचित्राला नमस्कार करता आला. माननीय श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितले की, अंतुले साहेबांनी जसा आमदारांचा मान-सन्मान वाढविला तसाच पोलिसांचा सुध्दा मान-सन्मान वाढविला. पूर्वी पोलिसांचा युनिफॉर्म हाफ पँट आणि शर्ट होता. अंतुले साहेबांनी मुख्यमंत्री पदाच्या काळात पोलिसांच्या युनिफॉर्ममध्ये बदल केला आणि हाफ पँटची फुल पँट केली. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सूचना केली आहे की, अंतुले साहेबांच्या नावाने सागरी महामार्ग व्हावा. त्यांनी जी सूचना केली आहे त्यास मी समर्थन देतो.

महोदय, श्री.मुरली देवरा, माजी वि.प.स. व केंद्रीय मंत्री व श्री.भास्करराव शिंदे, माजी वि.प.स. व स्वातंत्र्यसैनिक यांना सुध्दा मी आदरांजली वाहतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

नंतर श्री.कांबळे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. बॅ. अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री. मुरली सिताराम देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री व आमच्या जिल्ह्याचे मलकापूरचे सुपुत्र स्वातंत्र्य सैनिक श्री. भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेला शोक प्रस्तावावर माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी खूप माहिती दिली आहे.

सभापती महोदय, माझी या तीनही नेत्यांशी ओळख आमच्या नेत्या स्व. प्रेमलाताई चव्हाण यांच्यामुळे झाली. मी युवक कॉंग्रेसच्या चळवळीत असताना सन 1980 मध्ये ज्यावेळी बॅ. अंतुले साहेब मुख्यमंत्री म्हणून कराडला आले होते. त्यावेळच्या मेळाव्याचे आणि आनंदराव चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री यांच्या फोटोच्या अनावरणाच्या कार्यक्रमाचे सर्व नियोजन मी केले होते.

सभापती महोदय, श्री. मुरलीभाई देवरा यांच्याशी सुध्दा माझा संबंध काकींमुळे आला. श्री. भास्करराव शिंदे स्वातंत्र्य सैनिक होते. ते चव्हाण कुटुंबीयांवर आणि कॉग्रेस पक्षावर प्रेम करणारे होते. त्यांना "माय फ्रेंड" या नावाने महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्लीत सुध्दा ओळखत होते. त्यांचे अत्यंत अल्प शिक्षण झाले होते परंतु, आनंदराव चव्हाण यांच्या सानिध्यात असल्यामुळे वकिलांना लाजवेल असे ज्ञान त्यांनी संपादन केले होते. त्यांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी मलकापूर गावाची स्थापना नगरपंचायतीमध्ये केली. देशामध्ये 24X7 नळ पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून बक्षीस मिळविलेले 40-45 हजार लोकसंख्येचे गाव निर्माण करण्यामध्ये त्यांचे योगदान आहे.

सभापती महोदय, मी या सर्व नेत्यांना माझ्या कुटुंबीयांच्या वतीने विनम्र अभिवादन करतो आणि आदरांजली व्यक्त करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी बॅ. अब्दुल रहेमान अंतुले, श्री. मुरलीभाई देवरा व श्री. भास्करराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावावर मी माझ्या भावना व्यक्त करीत आहे. सभापती महोदय, सभागृहातील सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. मी आता फक्त 2 मुद्यांवर बोलणार आहे. पैंगबरवासी बॅ. अब्दुल रहेमान अंतुले हे इस्लामिक कल्चरचे अतिशय प्रगाढ असे अभ्यासक होते. तसेच ते अतिशय धर्मनिरपेक्ष वृत्तीने वागत होते. त्यांच्याबरोबर वावरणाऱ्या सर्व व्यक्तींनी मघापासून त्यांचे जे वर्णन केले आहे त्याची एक मिसाल म्हणजे त्यांची शिवशाहीबद्दलची आत्मीयता, अभिमान. त्यांनी शिवशाहीच्या अभिमानामुळेच मंत्रालयात शिवाजी महाराजांचे तैलचित्र लावले. त्यांनी सर्व ठिकाणी वेगवेगळ्या योजना आखल्या. त्यांनी निश्चितपणे अशी चांगली कामे केली आहेत. अल्पसंख्याकांसाठी गठीत केलेल्या न्या. सच्चर आयोगाच्या शिफारशी केंद्र शासनाने स्वीकरल्या आणि त्यानंतर न्या. सच्चर आयोगासंबंधी 15 कलमी कार्यक्रम राबविण्यात आला. तो 15 कलमी कार्यक्रम तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम बॅ. अंतुले साहेबांनी केले होते. न्या. सच्चर आयोगाच्या शिफारशी देशभर स्वीकारल्या गेल्या. आपले महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य होते ज्याने पंतप्रधानांचा 15 कलमी कार्यक्रम स्वीकारला. त्यामुळेच अल्पसंख्याकांच्या विकासाच्या अनेक योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

सभापती महोदय, रेवस ते रेडी सागरी महामार्गाचा उल्लेख करण्यात आला. मी आपणास सांगू इच्छिते की, ही बॅ. अंतुले साहेबांचीच कल्पना होती. रेवस ते रेडी सागरी महामार्गाचे 60-70 टक्के काम पूर्ण झाले आहे. सरकारने मनात आणले तर शिल्लक 20-25 टक्के काम पूर्ण होईल. माननीय नामदार श्री. दिवाकर रावते साहेब म्हणत होते की, रेवस ते रेडी महामार्ग तयार नाही. मी सांगू इच्छिते की, सदर सागरी महामार्गाचे 60-70 टक्के काम पूर्ण झाले आहे. आपण मनात आणले तर हा सागरी महामार्ग लवकरच 1-2 वर्षांत पूर्ण होईल आणि त्यांची एसटी गाडी तेथून सुरू होईल.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानू खलिफे ..........

रेवस ते रेड्डी पर्यंतचा सागरी महामार्ग सरकारने लवकरात लवकर पूर्ण करावा आणि त्या रस्त्याला अंतुले साहेबांचे नाव द्यावे, ही त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, मघापासून झालेल्या चर्चेत एक विषय चर्चेला आलेला नाही. दिनांक 10 नोव्हेंबर, 1966 रोजी महाजन आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला आणि तो नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मांडला गेला. त्यावेळी बॅरिस्टर अंतुले साहेब आमदार होते. त्यांनी महाजन आयोगाच्या अहवालावर "महाजन रिपोर्ट अनकव्हर्ड" असे एक पुस्तक लिहिले आहे व ते मी वाचलेले आहे. या पुस्तकात त्यांनी लिहिलेल्या एका वाक्याचा मला मुद्दामहून येथे उल्लेख करावयाचा आहे. त्यांनी असे लिहिले होते की, "जे जे महाराष्ट्राच्या हिताचे, ते ते या आयोगाला कावीळ झालेल्या पिवळ्या डोळांनी दिसले नाही." त्यांनी महाजन आयोगाच्या अहवालाची चिरफाड केली होती. सीमा वाद गेल्या 70 वर्षात सुटलेला नाही. आता तर दिवसेंदिवस तो अधिकाधिक उग्र बनत चालला आहे. मराठी जनतेचा खंदा पाठीराखा आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. कोकणासाठी अंतुले साहेब 'कोहिनूर' होते. हा कोहिनूर हिरा नियतीने हिरावून नेला आहे. मी माझ्या वतीने, कोकणी जनतेच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.मुरलीभाई देवरा हे 22 वर्षे मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. या विधान मंडळातील असे अनेक सन्माननीय सदस्य आहेत की, ज्यांना मुरली भाईंनी आमदारकीपर्यंत आणून ठेवले आहे. एक विश्वासू राजकारणी म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख आहे. केवळ काँग्रेस पक्षातीलच नव्हे तर अन्य पक्षातील नेते सुध्दा त्यांच्याकडे विश्वासू राजकारणी म्हणूनच पहात असत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे यांचे सुध्दा दु:खद निधन झाले आहे. या सर्वांना मी कोकणी जनतेच्या वतीने, माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहते आणि थांबते.

--------------

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे (उप सभापती) : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी माजी मुख्यमंत्री सन्माननीय श्री.अ.र.अंतुले, माजी केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री.मुरली देवरा आणि सन्माननीय विधान परिषद सदस्य श्री.भास्करराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या पूर्वीच्या वक्त्यांनी या तिघांबद्दल ज्या आदर भावना व्यक्त केल्या आहेत, त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे.

सभापती महोदय, आदरणीय अंतुले साहेबांचे एका शब्दात वर्णन करावयाचे झाले तर "झाले बहु, होतील बहु, तुज सम तु," असेच करावे लागेल. महाराष्ट्रात अत्यंत धडाडीची नेतृत्त्वे होऊन गेली त्यामध्ये अंतुले साहेबांचे स्थान अग्रभागी होते, असे मला वाटते. त्यांच्या अनेक आठवणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या आहेत. मी त्या आठवणींचा पुनरुच्चार करणार नाही. परंतु माझ्या राजकीय जीवनातील सुरुवातीचा बराचसा काळ हा अंतुले साहेबांसमवेत गेला आहे. मला त्यांचे अनेक वेळा मार्गदर्शन लाभले आहे. मी येथे त्यांच्याबद्दलची फक्त एक आठवण सांगणार आहे.

सभापती महोदय, सन 2010 मध्ये झालेल्या विधानपरिषद सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी मी उभा राहिलो होतो. त्यावेळी जवळपास सर्वच पक्षांनी आपले उमेदवार दिले होते. परंतु सन्माननीय शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे आणि स्व.अ.र.अंतुले साहेबांची प्रामुख्याने मला आठवण करावी लागेल. मी संध्याकाळी अंतुले साहेबांना फोन केला. माझ्या विरोधात ठाण्यातील काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने उमेदवारी अर्ज भरला होता. मी अंतुले साहेबांना फोन करुन विनंती केली की, हा अर्ज मागे घेतला गेला तर मला निवडणूक थोडी सोपी जाईल. मी रात्री रेल्वे गाडीने प्रवास करीत होतो. मला रात्री 10.30 वाजता फोन आला आणि त्यांनी सांगितले की, "वसंता तुझ्या विरुध्द उभ्या असलेल्या उमेदवाराचा अर्ज उद्या मागे घेतला जाईल, हा माझा शब्द आहे."

यानंतर श्री.मा.शिगम..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 14:25

श्री. वसंत डावखरे........

त्यानंतर त्यांचे शब्द अक्षरश: खरे ठरले. त्यावर्षी माझी बिनविरोध निवड झाली. त्यामुळे या दोन्ही मंडळींना माझ्या आयुष्यामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. मी या दोघांना मन:पूर्वक श्रद्धांजली वाहतो.

स्व. मुरली देवरा साहेबांचा देखील मला सहवास लाभला. स्व. भास्करराव ज्ञानोबा शिंदे यांचे कार्य देखील आपणा सर्वांना परिचित आहे. या तिन्ही थोर नेत्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी बॅ. अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री. मुरली सीताराम देवरा, माजी वि.प.स. व केंद्रीय मंत्री व श्री. भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यावर मी माझे विचार मांडत आहे.

कै. बॅ. अब्दुल रहेमान अंतुलेसाहेब यांचा आणि माझा व्यक्तिगत परिचय 40 वर्षाचा होता. एक कुशल आणि अत्यंत परखड विचार असणारे असे हे नेतृत्व. एखादा कार्यकर्ता घडवायचा असेल, त्याला वाढवायचा असेल, त्याला ताकद द्यायची असेल तर बॅ. अंतुले साहेब हे त्याच्या पाठीशी एक पहाड बनून आयुष्यभर उभे राहिले. 1980 मध्ये जेव्हा ते मुख्यमंत्री झाले त्यावेळी माझ ी आणि त्यांची 4 दिवसामध्ये तीन वेळा भेट झाली. प्रत्येक वेळी 2-3 मिनिटे बोलणे व्हायचे आणि विषय तुटायचा. एक दिवस मी त्यांना थांबविले आणि सांगितले की, आपण श्रीवर्धन मतदारसंघातून 5 वेळा निवडून आला आहात. डोंगर कसा असतो, संकटे कशी असतात, गरीब काय असतो असा एक विषय माझ्या महाराष्ट्राचा आहे. या विषयावरील भाषणाकरिता किती वेळ लागेल असे त्यांनी विचारले. त्यावेळी मी सांगितले की, संपूर्ण विषय मांडण्यासाठी 15 मिनिटे वेळ लागेल. महाराष्ट्रातील डोंगरी विभागांचा विकास, महाराष्ट्रातील आदिवासी विभाग आणि महाराष्ट्रातील दुष्काळी विभाग, तसेच महाराष्ट्रातील अति दुर्गम डोंगरी विभाग या सर्व विभागांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने, त्यांच्या विकासाच्या दृष्टीने, त्या भागाचा नियोजन पध्दतीने विकास करण्याकरिता काही मूलभूत गोष्टी करणे आवश्यक आहे. त्या गोष्टी त्या वेळी नव्हत्या. त्या दिवशी त्यांना यामध्ये काही अडचण आहे हे पटले. मी त्यांना सांगितले की, शिराळा या माझ्या मतदारसंघामध्ये डोंगरी भागातील कार्यकर्त्यांचा, सर्वसामान्य माणसांचा एक अतिभव्य मेळावा आयोजित करावयाचा आहे. 1981च्या दरम्यान डोंगरी विभागातील जवळपास 60 हजार सर्वसामान्य माणसांचा मेळावा आयोजित केला. कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी, पन्हाळगड, गगनबावडा या डोंगरी भागातील माणसांचा मेळावा यशस्वी झाला. त्या मेळाव्यास बॅ. अंतुले साहेबांनी येण्याचे कबूल केले होते. तात्विक दृष्टीने बॅ. अंतुले साहेब आणि वसंतदादा पाटील हे एका व्यासपीठावर बसत नव्हते. मी बॅ. अंतुले साहेबांना सांगितले की, आपण त्या मेळाव्यास मुख्यमंत्री म्हणून येणार आहात, तसेच वसंतदादा पाटील यांना देखील मी विशेष आमंत्रित म्हणून

..3..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 14:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

बोलविणार आहे. त्यावेळी बॅ. अंतुले साहेबांनी सांगितले की, अपवाद म्हणून तुम्ही जे काही करत आहात त्याला माझी मान्यता आहे. त्यावेळी दोघांच्याही उपस्थितीमध्ये शिराळा येथे डोंगरी विभागातील माणसांचा मेळावा यशस्वी झाला. त्यावेळी डोंगरी विभागाला एक बेस घेऊन ग्रॅण्ट देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. डोंगरी विभागाचा जो काही विकास आज झालेला आहे त्याच्या पाठीमागे बॅ. अंतुले साहेबांची प्रेरणा होती.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..........

बॅ.अंतुले श्रीवर्धन मतदारसंघातून पाच वेळा आमदार म्हणून निवडून आले. लोकसभेचे चार वेळा खासदार होते आणि राज्यसभेचे देखील ते खासदार होते. केंद्रीय आरोग्य मंत्री म्हणून त्यांनी काम केले. स्व.इंदिरा गांधी यांचे ते विश्वासू सहकारी होते. अखिल भारतीय कॉंग्रेसचे ते सरचिटणीस होते. एक ध्येयवादी, जबरदस्त जिद्दीचा आणि सामान्यातील सामान्य माणसाला पूर्ण ताकद देणारा लढवय्या नेता या दृष्टीने त्यांच्याकडे पाहण्याची गरज आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करीत असताना मी एका इंग्रजी वाक्याचा उल्लेख करु इच्छितो. Let us perish, keep the flag flying. याचा अर्थ असा की, कितीही संकटे आली तरी चालतील, साक्षात मृत्युला कवटाळावे लागले तरी चालेल, परंतु माझ्या देशाचा तिरंगा फडकत राहील अशा प्रकारची जबरदस्त इच्छाशक्ती त्यांच्या ठायी होती. बॅ.अंतुले यांचे उचित स्मारक उभारण्याच्या दृष्टीने विचार पुढे आला आहे. सागरी महामार्गाला त्यांचे नाव द्यावे असेही बोलले गेले. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, महाराष्ट्राच्या दृष्टीने प्रशासन आणि बुध्दिमत्तेचे विद्यार्थी या विषयाला जर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर न्यायचे असेल तर महाराष्ट्रामध्ये त्यांच्या नावाने एखादी शैक्षणिक संस्था उभी केली तर ते उचित स्मारक होईल. मी त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय मुरलीजी देवरा हे मुंबई महानगरपालिकेचे सदस्य होते, महापौर होते. 22 वर्षे ते मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. सध्या ते आणि मी अखिल भारतीय कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सदस्य होतो. राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तिमत्व या दृष्टीने मुरलीजी देवरा यांना संपूर्ण देश आणि देशातील कॉंग्रेसचे नेते, कार्यकर्ते ओळखत होते. अत्यंत प्रामाणिक, जिद्दीचा आणि राजकारण असेल तेथे राजकारण करणारा, अन्यथा सर्व पक्षांशी अत्यंत चांगले संबंध ठेवणारा कॉंग्रेसचा नेता या दृष्टीने त्यांचे वर्णन करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर सन्माननीय सदस्य भास्करराव शिंदे यांना मी अनेक वर्षे ओळखत होतो. माननीय सदस्य श्री.आनंदराव पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे स्व.डी.आर.चव्हाण, स्व.प्रेमलाकाकी चव्हाण आणि सन्माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण या कुटुंबीयांशी जीवाभावाने वागणारा आणि गरीबांची सेवा करणारा असे हे व्यक्तिमत्व होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी बॅ.अब्दुल रहेमान अंतुले, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, श्री.मुरली देवरा, माजी वि.प.स. व माजी केंद्रीय मंत्री

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..........

व श्री.भास्करराव ज्ञानोबा शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या निमित्ताने मी या तीनही दिवंगत नेत्यांच्या स्मृतीला अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक मंगळवार, दिनांक 9 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 34 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 9 डिसेंबर, 2014 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही